**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे,**

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय, राजगुरूनगर

ता. खेड, जि. पुणे- 410 505

(शैक्षणिक वर्ष 2020 - 2021 पासून)

वर्ग:- द्वितीय वर्ष वाणिज्य शाखा (S.Y.B.Com.)

विषय:- व्यावसायिक अर्थशास्त्र (स्थूल)-I

Business Economics (Macro) -I

सेमिस्टर :- III

मार्गदर्शक प्राध्यापक

डॉ. उमेश भोकसे - व्यावसायिक अर्थशास्त्र विभागप्रमुख

SBM RAJGURUNAGAR Bus. Economics Dept.

## प्रकरण पहिले

## 1. स्थूल अर्थशास्त्राची ओळख

1. प्रस्तावना:-

अर्थशास्त्र हे मानवाच्या आर्थिक वर्तनाचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. मर्यादित साधन संपत्तीच्या मदतीने व्यक्ती आपल्या अमर्यादित गरजांची पूर्तता कशा पद्धतीने करतो, या मानवी वर्तनाचा अभ्यास आणि विश्लेषण अर्थशास्त्रज्ञ करतात. ज्या पद्धतीने समाजातील एका व्यक्तीच्या आर्थिक वर्तनाचा अभ्यास केला जातो, त्याच पद्धतीने संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या आर्थिक वर्तनाचाही अभ्यास अर्थशास्त्रामध्ये केला जातो. अर्थव्यवस्थेच्या विकासाची गती, त्यावर परिणाम करणाऱ्या विविध घटकांची भूमिका, कालपरत्वे बदलत जाणाऱ्या विविध आर्थिक घटकांचे महत्त्व इत्यादीचा अभ्यास अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून समग्र पातळीवर केला जातो. कोणतीही व्यक्ती असो अथवा समाज, त्यांच्या आर्थिक वर्तनाचा अभ्यास अर्थशास्त्राच्या वेगवेगळ्या दृष्टिकोनातून करण्यात येतो. त्यालाच प्रामुख्याने सूक्ष्म अर्थशास्त्रीय विश्लेषण आणि स्थूल अर्थशास्त्रीय विश्लेषण असे म्हटले जाते.

अर्थव्यवस्थेतील कोणत्याही एका वैयक्तिक आर्थिक घटकाच्या वर्तनाचा अभ्यास सूक्ष्म अर्थशास्त्रात केला जातो. जसे एक व्यक्ती , एक बाजार, एक उद्योगसंस्था इत्यादी. एका आर्थिक घटकाच्या आर्थिक वर्तनाचा अभ्यास करीत असताना इतर घटक स्थिर आहेत असे गृहीत मानले जाते. बाजारातील एका वस्तूच्या कि मतीत घट झाल्यास त्याचा परिणाम सर्वच उपभोक्त्यांच्या खरेदीवर सारख्याच प्रमाणात होईल असे म्हण ता येत नाही.आणि म्हणूनच एका उपभोक्त्या च्या वर्तनाच्या अभ्यासातून आलेले निष्कर्ष संपूर्ण उपभोक्त्यांसाठी लागू करता येत नाहीत. याकरिता एका आर्थिक घटकांचा अभ्यास आणि त्यांच्या एकत्रिततेचा अभ्यास वेगवेगळ्या दृष्टिकोनातून करावा लागतो. समग्र समाजाच्या आर्थिक वर्तनाचा अभ्यास स्थूल अर्थशास्त्रामध्ये केला जातो. एका उदाहरणाच्या मदतीने आपणास सूक्ष्म आणि स्थूल अर्थशास्त्राच्या अभ्यासाची गरज लक्षात येईल. व्यक्तिगत पातळीवरील श्रम पुरवठ्याचा वक्र डावीकडून उजवीकडे वर जाणारा असतो आणि एका विशिष्ट बिंदूनंतर तो पुन्हा डावीकडे वळून श्रम पुरवठा घटक जातो हे दर्शवितो. परंतु अर्थव्यवस्थेतील श्रम पुरवठ्याचा वक्र मात्र डावीकडून उजवीकडे वर जाणाराच असतो. तो वैयक्तिक श्रम पुरवठ्याच्या वक्राप्रमाणे एका विशिष्ट बिंदूनंतर डावीकडे वळत नाही.

जगातील विविध देशांच्या अर्थव्यवस्थांच्या विकासाची गती ही वेगवेगळी आहे. काही अर्थव्यवस्था एका स्थिर गतीने सातत्यपूर्ण विकास करीत असतात, तर काही अर्थव्यवस्थांच्या विकासाच्या गतीमध्ये मात्र नियमितपणे चढ-उतार येतात. काही अर्थव्यवस्थांमध्ये बेरोजगारी, चलनवाढ यांसारख्या समस्या निर्माण होतात, तर काही अर्थव्यवस्थांमध्ये अति उत्पादन, पूर्ण रोजगार यासारखी स्थिती असते. ही सर्व परिस्थिती निर्माण होण्याची कारणे कोणती आहेत, अर्थव्यवस्थेतील समस्यांची सोडवणूक करून तिच्या विकासाची गती वाढवता येणे शक्य आहे का, या आणि यांसारख्या अनेक प्रश्नांचा अभ्यास स्थूल अर्थशास्त्रामध्ये केला जातो. २००८ मध्ये आलेल्या अमेरिकेतील मंदीमुळे जगातील अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांच्या वि कासाची गती कमी झाली. भारतीय अर्थव्यवस्थेवरही त्याचा मोठ्या प्रमाणात परिणाम झाला. परंतु सुदैवाने भारतातील वित्तीय क्षेत्र मात्र त्यातून बचावले. अमेरिकेतील सक्षम समजल्या जाणाऱ्या वित्तीय संस्था २००८ च्या आर्थिक धक्क्यातून सावरू शकल्या नाहीत. याची कारणे शोधणे आणि त्यावर उपाय सुचविणे हे स्थूल अर्थशास्त्राचे काम आहे.

सनातनवादी आणि नवसनातनवादी आर्थिक सिद्धान्ताचा मुख्य पाया पूर्ण रोजगाराचा होता. त्यांच्या मते बाजार यंत्रणा कार्यक्षम असतात. बाजारशक्तीच्या मदतीने अर्थव्यवस्थेत दीर्घकाळात पूर्ण रोजगार प्राप्त होतो. कार्यक्षम बाजार यंत्रणेच्या मदतीने वस्तू

SBM RAJGURUNAGAR Bus. Economics Dept.

आणि सेवांच्या उत्पादनाची युक्ततम पातळी गाठली जाते. उत्पादन घटकांच्या किमती निर्धारित होतात. दीर्घकाळात अर्थव्यवस्था संतुलनावस्थेमध्ये येते. पूर्ण रोजगाराचे गृहीत असल्यामुळे सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी किंमत निर्धारणावर अधिक लक्ष केंद्रित केले. सनातनवादी अर्थशास्त्रीय सिद्धान्ताचा पाया जे.बी.से. यांच्या बाजार नियमावर आधारित आहे. त्यांच्यामध्ये भांडवलशाही अर्थव्यवस्थेत बाजार यंत्रणेवर कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप नसेल तर अर्थव्यवस्थेत कोणत्याही प्रकारची बेरोजगारी आणि उत्पादक क्षमतांचा अपुरा वापर राहात नाही. अर्थव्यवस्थेत एकूण मागणीत जरी घट झाली तरी दीर्घकाळात ती आपोआप भरून निघते. अर्थव्यवस्थेतील चढ आणि उतार हे अल्पकालीन प्रश्न आहेत. सक्षम बाजार यंत्रणेकडून दीर्घकाळात ते आपोआप सुटतात. जे. बी.से. यांच्यामते, 'प्रत्येक पुरवठा स्वतःची मागणी निर्माण करतो.'

१९२९ मध्ये आलेल्या जागतिक महामंदीतून बाहेर पडण्यासाठी दुर्दैवाने सनातनवादी अर्थशास्त्र कोणत्याही प्रकारचे उपाय किंवा मार्ग सुचवू शकले नाही. वैयक्तिक आर्थिक घटकांच्या वर्तनावर लक्ष केंद्रित केल्यामुळे समग्र अर्थव्यवस्थेच्या विश्लेषणासाठी सनातनवादी आर्थिक सिद्धान्त अपुरे पडले. अर्थव्यवस्थेच्या विकासाची गती वाढविण्यासाठी कोणकोणत्या धोरणांचा अवलंब करणे आवश्यक आहे, याची शिफारस स्थूल अर्थशास्त्राकडून सरकारला केली जाते. अर्थशास्त्राच्या या शाखेचा उगम अलीकडच्या काळात झालेला आहे. १९२९ च्या जागतिक महामंदीनंतर अर्थशास्त्रामध्ये आमूलाग्र बदल घडून आल्याचे दिसून येते. सनातनवादी अर्थशास्त्राला झिडकारून जे. एम. केन्स यांनी अर्थव्यवस्थेला मंदीच्या दरीतून बाहेर काढण्यासाठी आपल्या आर्थिक सिद्धान्ताची मांडणी केली. १९३६ मध्ये केन्स यांनी 'रोजगाराचा सामान्य सिद्धान्त' हा ग्रंथ प्रकाशित केला. या ग्रंथात त्यांनी सनातनवादी आर्थिक सिद्धान्तांवर कडाडून टीका केली आणि यानंतर खऱ्या अर्थाने स्थूल अर्थशास्त्राच्या विकासाला सुरुवात झाली.

1.2.1 स्थूल अर्थशास्त्राचा अर्थ आणि व्याख्या :-

नॉर्वे देशातील ओस्लो विद्यापीठाच्या प्राध्यापक रॅग्नर फ्रिश्च (Ragnar Frisch) यांनी १९३३ मध्ये पहिल्यांदा अर्थशास्त्राची विभागणी सूक्ष्म अर्थशास्त्र आणि स्थूल अर्थशास्त्र या दोन शाखांमध्ये केली. अर्थव्यवस्थेतील वैयक्तिक आर्थिक घटकाच्या वर्तनाचा अभ्यास करणारे शाखा म्हणजे सूक्ष्म अर्थशास्त्र आणि आर्थिक घटकाच्या समग्रतेचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे स्थूल अर्थशास्त्र अशी मांडणी त्यांनी केली. Micro (मायक्रो) या इंग्रजी शब्दाची उत्पत्ती मायक्रोस (Micros) या ग्रीक शब्दापासून झालेली आहे. मायक्रोस (Micros) म्हण जे सूक्ष्म किंवा लहान असा ग्रीक भाषेतील अर्थ आहे. यापासूनच मायक्रो

SBMPAGURUNAGAR Bus. Economics Dept.

इकॉनॉमिक्स (Microeconomics) म्हणजेच सूक्ष्म अर्थशास्त्र या शब्दाची निर्मिती झाली. याप्रमाणेच मॅक्रोस (Macros) या ग्रीक शब्दापासून मॅक्रो (Macro) या इंग्रजी शब्दाची निर्मिती झाली. मॅक्रोस (Macros) या ग्रीक भाषेतील शब्दाचा अर्थ मोठा, विशाल किंवा बृहद् असा आहे. या शब्दापासून इंग्रजीतील मॅक्रो (Macro) म्हण जेच मोठा किंवा स्थूल हा शब्द निर्माण झालेला आहे. मॅक्रो इकॉनॉमिक्स (Macroeconomics) म्हणजेच स्थूल अर्थशास्त्र या शब्दाची निर्मिती ग्रीक भाषेतील मॅक्रोस (Macros) या शब्दा पासून झालेली आहे.

सूक्ष्म अर्थशास्त्र म्हणजे विशिष्ट उद्योगसंस्था, विशिष्ट उपभोक्ता, विशेष, वेतन, उत्पन्न, उद्योग आणि विशिष्ट वस्तू यांचा अभ्यास होय. कोणत्याही आर्थिक घटकाच्या वैयक्तिकतेचा अभ्यास सूक्ष्म अर्थशास्त्रात केला जातो. याउलट स्थूल अर्थशास्त्रामध्ये आर्थिक घटकांच्या समग्रतेचा अभ्यास केला जातो. जसे पूर्ण रोजगार, राष्ट्रीय उत्पन्न, सामान्य किंमत पाच, उद्योग, एकूण मागणी, एकूण पुरवठा इत्यादी. आर्थिक घटकांच्या वैयक्तिक पातळीवरील वर्तनामध्ये आणि समग्र पातळीवरील वर्तनामध्ये तफावत असते. बचत ही एका कुटुंबाच्या आर्थिक विकासासाठीचा उत्तम मार्ग असला तरी संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठी बचत हानिकारक असते. उत्पन्नातील अधिक हिस्सा उपभोगावर खर्च होणे, अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. पातळीवरील बचत आणि अर्थव्यवस्थेच्या पातळीवरील बचत यांच्या विश्लेषणात आणि परिणामात फरक असतो. अनेक अर्थशास्त्रज्ञांनी स्थूल अर्थशास्त्राच्या व्याख्या केलेल्या आहेत. त्यापैकी काही व्याख्या आपणास खालीलप्रमाणे पाहता येतात.

केनेथ बौल्डिंग:-

"स्थूल अर्थशास्त्राचा संबंध आर्थिक घटकांच्या वैयक्तिकतेशी नसून त्याच्या समग्र देशी आहे. वैयक्तिक उत्पन्नाशी नसून राष्ट्रीय उत्पन्नाशी आहे. एका वस्तूच्या किमतीशी नसून सामान्य किंमत पातळीशी आहे. वैयक्तिक उत्पादनाशी नसून राष्ट्रीय उत्पादनाशी आहे."

गार्डनर ॲक्ले:-

गार्डनर ॲक्ले यांनी सूक्ष्म आणि स्थूल अर्थशास्त्रातील फरक अगदी स्पष्ट शब्दांत सांगितलेला आहे. "स्थूल अर्थशास्त्राचा संबंध अर्थव्यवस्थेच्या उत्पादनाच्या समग्र चलांशी आहे, संसाधनाच्या रोजगाराची आहे, राष्ट्रीय उत्पन्नाचा आकार व सामान्य किंमत पातळीशी आहे."

ग्रेगरी मॅनक्यू:-

"स्थूल अर्थशास्त्र अर्थव्यवस्थेच्या समग्र पातळीवरील वर्तनाशी संबंधित आहे, ज्यामध्ये आर्थिक भरभराट आणि घसरण, अर्थव्यवस्थेतील वस्तू आणि सेवांचे एकूण

SBMRAJGURUNAGAR Bus. Economics Dept.

उत्पादन, उत्पादनवृद्धी, चलनवाढ बेरोजगारीचा दर, व्यवहारतोल आणि विनिमय दराचा समावेश होतो."

एरोल डिसोझा :-

"स्थूल अर्थशास्त्र वस्तू बाजार, रोखे बाजार, श्रम बाजार आणि पैसा बाजार यांचे आकलन आणि ते बाजार एकमेकांवर कसे परिणाम करतात याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न करते."

स्थूल अर्थशास्त्र हे अर्थव्यवस्थेतील आर्थिक घटकांच्या एकत्रिततेचा अभ्यास करते. जसे सूक्ष्म अर्थशास्त्रात व्यक्तीच्या वैयक्तिक उत्पन्नाचा अभ्यास केला जातो, त्याप्रमाणेच स्थूल अर्थशास्त्रात राष्ट्रीय उत्पन्नाचा अभ्यास केला जातो. आर्थिक घटकांच्या एकत्रित याचा अभ्यास आणि विविध आर्थिक घटकांमधील परस्परसंबंधाचा अभ्यास स्थूलशास्त्रात केला जातो. उदाहरणार्थ महागाई आणि बेरोजगारी यांच्यातील परस्पर संबंध, महागाई आणि उत्पादन यांच्यातील संबंध, उत्पादन आणि रोजगार यांच्यातील संबंध इत्यादी. अर्थव्यवस्थेत निर्माण होणाऱ्या विविध समस्यां ची कारणे शोधणे, त्यावर उपाय सुचविणे, भविष्यात अशा प्रकारच्या समस्या निर्माण होऊ नयेत म्हणून कोणत्या प्रकारच्या आर्थिक धोरणांचा अवलंब करणे आवश्यक आहे याची मांडणी करणे, संख्याशास्त्रीय साधनाचा उपयोग करून समग्र आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करणे हा स्थूल अर्थशास्त्राचा अभ्यास विषय आहे.

1.2.2 स्थूल अर्थशास्त्राचे स्वरूप :-

स्थूल अर्थशास्त्र हे उत्पन्न आणि रोजगाराचे सिद्धान्त म्हणून ओळखले जाते. स्थूल अर्थशास्त्राचा संबंध संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या विश्लेषणाची आहे. अर्थव्यवस्थेतील विविध आर्थिक घटकांचे विश्लेषण करणे, त्या घटकांच्या अल्पकालीन आणि दीर्घकालीन वर्तनाचा अभ्यास करणे, विविध आर्थिक घटकांच्या मधील परस्पर संबंध प्रस्थापित करणे, अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी आर्थिक धोरणांची मांडणी करणे, अमलात आणलेल्या आर्थिक धोरणांच्या फलनिष्पत्तीचे मूल्यमापन करणे इत्यादी बाबींचा समावेश स्थूल अर्थशास्त्रामध्ये होतो. स्थूल अर्थशास्त्र म्हणजे हत्तीच्या एकूण आकाराचा आणि त्याच्या वर्तनाचा अभ्यास होय. त्यातील कोणत्याही एका अवयवाचा अभ्यास सूक्ष्म अर्थशास्त्राचा भाग आहे. संपूर्ण जंगलाचा अभ्यास करणे म्हणजे स्थूल अर्थशास्त्र , तर त्यातील एका एका झाडाचा स्वतंत्रपणे अभ्यास करणे म्हणजे सूक्ष्म अर्थशास्त्र होय. स्थूल अर्थशास्त्राचे स्वरूप
खालीलप्रमाणे सांगता येते.

SBM RAJGURUNAGAR Bus. Economics Dept.

1. आर्थिक घटकांच्या समग्रतेचा अभ्यास:

स्थूल अर्थशास्त्रामध्ये आर्थिक चलनाच्या समग्रतेचा अभ्यास केला जातो. जसे, राष्ट्रीय उत्पन्न , एकूण रोजगार, एकूण मागणी आणि पुरवठा, सामान्य किंमत पातळी इत्यादी. स्थूल अर्थशास्त्राची मांडणीच मुळात आर्थिक घटकांच्या समग्रतेत आहे. सूक्ष्म अर्थशास्त्रातील सिद्धान्त आणि तत्त्वे संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठी लागू करता येत नाही. वैयक्तिक आर्थिक घटकांचे वर्तन त्याच्या एकत्रिततेच्या पातळीवर बदलते. जसे व्यक्तिगत पातळीवरील श्रमाचा पुरवठा वक्र एका विशिष्ट बिंदूनंतर मागे वळणारा असतो, परंतु अर्थव्यवस्थेतील एकूण श्रम पुरवठा वक्र डावीकडून उजवीकडे कायम वर जाणारा असतो. बचतीच्या बाबतीतही तसेच सांगता येते. व्यक्तिगत पातळीवर लाभदायी असणारी बचत अर्थव्यवस्थेच्या पातळीवर मात्र धोकादायक ठरते. कोणत्याही आर्थिक घटकाचे व्यक्तिगत पातळीवरील वर्तन आणि समग्र पातळीवरील वर्तन असल्याने स्थूल अर्थशास्त्रात त्याच्या समग्रतेचा अभ्यास केला जातो.

2. सामान्य संतुलनाचे विश्लेषण:

स्थूल अर्थशास्त्र हे अर्थव्यवस्थेच्या सामान्य संतुलनाशी संबंधित आहे. सामान्य संतुलन याचा अर्थ अर्थव्यवस्थेतील प्रत्येक घटकाचे संतुलन होय. अर्थव्यवस्थेतील वस्तू बाजार, घटक बाजार, भांडवल बाजार संतुलन अवस्थेमध्ये असणे म्हण जे अर्थव्यवस्थेचे संतुलन होय. अर्थव्यवस्थेच्या सामान्य संतुलन विश्लेषणासाठी स्वतंत्र सिद्धान्ताची मांडणी स्थूल अर्थशास्त्रामध्ये केली जाते. विविध आर्थिक घटकांमध्ये जसा परस्पर संबंध असतो तसाच विविध बाजारांमध्येही परस्पर संबंध असतो. एका बाजारातील असंतुलन याचा परिणाम दुसऱ्या बाजारात असंतुलन निर्माण होण्यामध्ये होतो. जसे श्रम बाजारात श्रमाचा पुरवठा अधिक असेल तर त्यातून बेरोजगारी निर्माण होते आणि अंतिमतः वस्तू बाजारातील वस्तू व सेवांची मागणी कमी होते. थोडक्यात, संपर्णू अर्थव्यवस्थेचे सामान्य संतुलन हा स्थूल अर्थशास्त्राचा अभ्यास विषय आहे.

3. दीर्घकालीन उद्दिष्टे :

पूर्ण रोजगार पातळी गाठणे आणि ती कायम राखणे हे स्थूल अर्थशास्त्राचे प्रथम आणि दीर्घकालीन उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी कोणत्या आर्थिक धोरणाचा अवलंब करणे गरजेचे आहे याचे विश्लेषण स्थूल अर्थशास्त्रात केले जाते. पूर्ण रोजगाराबरोबरच स्थिर आणि वेगवान आर्थिक वि कास, आर्थिक स्थैर्य आणि किंमत स्थैर्य ही स्थूल अर्थशास्त्राची दीर्घकालीन उद्दिष्टे आहेत. ही उद्दिष्टे गाठण्यासाठी कालावधी निश्चि त करणे महत्त्वाचे असते. दीर्घकालीन उद्दिष्टे साध्य करण्यासाठी काही अल्पकालीन उद्दिष्टे निर्धारित करावी लागतात. दीर्घकाळाची विभागणी काही अल्पकाळामध्ये करावी लागते आणि त्यानुसार अल्पकालीन

SBM RAJGURUNAGAR Bus. Economics Dept.

उद्दिष्टे ठरवावी लागतात. स्थूल अर्थशास्त्रामध्ये अशा प्रकारची मांडणी केली जाते. सनातनवादी आणि नवसनातनवादी आर्थिक सिद्धान्ताचा भर दीर्घकालीन विश्लेषणावर होता. परंतु दीर्घकाळात आपण सर्व मृत असतो अशी मांडणी करून केन्स यांनी अर्थशास्त्राची मांडणी अल्पकालीन आणि दीर्घकालीन वि श्लेषण यावर आधारित केलेली आहे.

4. आर्थिक घटकांच्या वर्तनावर आधारित विश्लेषण:

शास्त्राच्या सिद्धान्ताचे यश त्याच्या विश्लेषण पद्धतीवर अवलंबून असते. वास्तव जगातील आर्थिक घटकांच्या प्रत्यक्ष वर्तनाचा अभ्यास करून आर्थिक सिद्धान्ताची मांडणी करण्याचे काम स्थूल अर्थशास्त्रात केले जाते. याकरिता विविध आर्थिक चलांच्या वर्तनाची माहिती गोळा केली जाते आणि त्यानुसार त्याचे विश्लेषण करून आर्थिक सिद्धान्ताची मांडणी आणि त्यांचे मूल्यमापन स्थूल अर्थशास्त्रात केले जाते. जसे फिलिप्स यांनी जवळपास दीडशे वर्षांच्या माहितीवर आधारित महागाई आणि बेरोजगारी यांच्यातील संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. फिलिप्स वक्र हा स्थूल अर्थशास्त्रामध्ये एक महत्त्वाचा वक्र आहे. जर रोजगाराची पातळी वाढवायची असेल तर काही प्रमाणात महागाई सहन करावी लागेल असे विश्लेषण फिलिप्स यांनी प्रत्यक्ष जगातील माहितीवर आधारित केले आहे. याकरिता त्यांनी ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेतील महागाई आणि रोजगाराच्याआकडेवारीचा आधार घेतलेला आहे.

5. निगमन पद्धतीचा वापर:

आगमन आणि निगमन या सामाजिक क्षेत्रातील प्रमुख दोन अभ्यास पद्धती आहेत. आगमन पद्धतीमध्ये प्रथमतः तथ्य संकलन केले जाते आणि त्याद्वा रा निष्कर्ष काढले जातात. वास्तव जगातील सत्य संकलनावर आधारित काढलेले निष्कर्ष हे अधिक अचूक आणि वास्तवदर्शी असतात. कमीत-कमी गृहीतकांवर आधारित आणि अधिकाधिक वास्तवावर आधारित अशी पद्धत आहे. स्थूल अर्थशास्त्रीय विश्लेषणासाठी निगमन पद्धत मोठ्या प्रमाणात उपयोगात आणली जाते. प्रथम समस्येची निवड करणे, त्यानंतर गृहीतकाची मांडणी करणे, त्यानुसार माहिती म्हणजेच तथ्य संकलन करणे, संख्याशास्त्रीय साधनांची निवड करणे आणि अंतिमतः निष्कर्षापर्यंत पोहोचणे या टप्प्यांचा अवलंब निगमन पद्धतीमध्ये केला जातो. ही पद्धत खर्चिक आणि वेळखाऊ असली तरी ती अधिक वास्तव असल्याने त्यातून आलेले निष्कर्ष हे अचूक ठरतात. भारतात प्रत्येक दहा वर्षांनी केली जाणारी जनगणना ही या पद्धतीचे चपखल उदाहरण आहे.

6. किमान गृहीते:

SBM RAJGURUNAGAR Bus. Economics Dept.

आर्थिक सिद्धान्ताची मांडणी करीत असताना गृहीतांची संख्या जेवढी कमी असेल तेवढी ते सिद्धान्त अधिक वास्तवदर्शी आणि व्यावहारिक जगात लागू होणारे असतात. सूक्ष्म अर्थशास्त्रातील सिद्धान्ताची मांडणी करीत असताना गृहीतांची संख्या मोठी असते. स्थूल अर्थशास्त्राचे विश्लेषण मुळात वास्तविक जगातील माहितीवर आधारित असल्याने यामध्ये कमीत-कमी गृहीते मांडली जातात. अर्थव्यवस्थेतील विविध समस्यांची मांडणी करीत असताना त्याबद्दलची प्रत्यक्ष माहिती गोळा केली जाते आणि त्यातून त्या प्रश्नाची सोडवणूक करण्याचा प्रयत्न केला जातो. १९२९ मध्ये आलेल्या जागतिक महामंदीने निर्माण केलेले प्रश्न सोडवण्यात स्थूल अर्थशास्त्राचा विकास झालेला आहे. थोडक्यात, किमान गृहीते आम्ही कमाल यावर आधारित विश्लेषण स्थूल अर्थशास्त्रामध्ये केले जाते. त्यामुळे स्थूल अर्थशास्त्र हे अधिक व्यावहारिक आणि वास्तवदर्शी करते.

7. संख्याशास्त्रीय साधनांचा उपयोग:

संख्याशास्त्राच्या मदतीने आर्थिक सिद्धान्ताची मांडणी करणे म्हणजे अर्थशास्त्राला काल्पनिक जगातून किंवा गृहीतक आमच्या जगातून प्रत्यक्ष व्यावहारिक जगात घेऊन येणे होय. संख्याशास्त्राच्या मदतीने आर्थिक सिद्धान्ताची मांडणी करण्याचा प्रयत्न विविध अर्थशास्त्रज्ञांनी केल्यामुळेच खऱ्या अर्थाने अर्थशास्त्र या सामाजिक विषयाला शास्त्राचा दर्जा मिळाला. प्रारंभीच्या काळात आर्थिक सिद्धान्ताची मांडणी ही शाब्दिक आणिविश्लेषणात्मक स्वरूपात केली जात असे, परंतु डेव्हिड रिकार्डो यासारख्या अर्थशास्त्रज्ञांनी गणितीय आणि संख्याशास्त्रीय साधनांचा उपयोग करून आर्थिक सिद्धान्त आणि तत्त्वे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. संख्याशास्त्राने विकसि त केलेल्या विविध साधनांचा उपयोग करून आर्थिक धोरणे, तत्त्वे आणि सिद्धान्त यांची मांडणी आणि मूल्यमापन स्थूल अर्थशास्त्रात केले जाते. अलीकडच्या काळात अर्थशास्त्रामध्ये गणितीय अर्थशास्त्र, संख्याशास्त्रीय अर्थशास्त्र आणि त्रिकोणमिती या स्वतंत्र शाखा विकसित झालेल्या आहेत.

थोडक्यात स्थूल अर्थशास्त्र हे व्यावहारिक जगाचे विश्लेषण असल्याने आणि तत्कालीन परिस्थितीमुळे त्याच्या विकासास हातभार लागल्यामुळे ते अधिक वास्तवदर्शी आणि व्यावहारिक झालेले आहे. काळानुरूप विकसित होत जाणाऱ्या विविध साधनांचा उपयोग करून आणि बदलत्या परिस्थि तीनुसार अर्थशास्त्रीय सिद्धान्ताची मांडणी करून स्थूल अर्थशास्त्र हे अधिक विकसित होत असलेले शास्त्र आहे.

1.2.3 स्थूल अर्थशास्त्राची व्याप्ती:-

1. राष्ट्रीय उत्पन्न:

SBMPAC RUNAGAR Bus. Economics Dept.

राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे एका वर्षाच्या कालावधीत देशात उत्पादित होणाऱ्या वस्तू आणि सेवांचे बाजार मूल्य होय. दीर्घकालीन स्थूल अर्थशास्त्रीय उद्दिष्टे साध्य करण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्न महत्त्वाची भूमिका बजावते. राष्ट्रीय उत्पन्नाची व्याख्या करणे, त्याच्या विविध संकल्पनांची मांडणी करणे हा स्थूल अर्थशास्त्राचा अभ्यास विषय आहे. उपलब्ध संसाधने आणि तंत्रज्ञान यांच्या मदतीने राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ अधिकाधिक कशी साधता येईल यासाठीची नीती तयार केली जाते. राष्ट्रीय उत्पन्नाचे प्रमाण जेवढे अधिक तेवढी त्या देशातील पायाभूत सुविधांची उपलब्धता अधिक आणि लोकांच्या राहणीमानाचा दर्जा अधिक. अशी सरळ सोपी मांडणी अर्थशास्त्रात केली जाते. थोडक्यात, आर्थिक विकास आणि पूर्ण रोजगार साध्य करण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्न हे महत्त्वाचे साधन आहे. राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीमुळे अर्थव्यवस्थेचा विकास साध्य होतो आणि ती अधिकाधिक समृद्ध आणि विकसित होते. स्थूल अर्थशास्त्रामध्ये राष्ट्रीय उत्पन्नाच्या सर्वांगीण बाजूचा अभ्यास केला जातो. राष्ट्रीय उत्पन्न मापनाच्या पद्धती विकसित करणे, नवनवीन तंत्रे आणि पद्धती शोधणे, राष्ट्रीय उत्पन्न मोजमाप आतील अडचणी दूर करण्यासाठीचे उपाय सुचविणे याकरिता स्थूल अर्थशास्त्र प्रयत्न करीत असते.

2. रोजगार आणि उत्पादनाचे सिद्धान्त :

अर्थव्यवस्थेतील रोजगाराची पातळी कशी निर्धारित होते हा स्थूल अर्थशास्त्रातील मूलभूत प्रश्न आहे. अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाची आणि रोजगाराची पातळी का कमी असते आणि ती वाढविण्यासाठी कोणत्या स्वरूपाचे प्रयत्न करणे गरजेचे आहे याचा अभ्यास स्थूल अर्थशास्त्रात केला जातो. पूर्ण रोजगार अवस्था गाठणे हे स्थूल अर्थशास्त्राचे प्रमुख उद्दिष्ट आहे. याकरिता अर्थव्यवस्थेतील रोजगाराच्या संरचनेचा अभ्यास करणे, यासंबंधीच्या सैद्धान्तिक बाबींचे विश्लेषण करणे आणि रोजगार वाढविण्यासाठी कोणत्या आर्थिक धोरणाचा अवलंब करता येईल याची मांडणी करणे हा स्थूल अर्थशास्त्राचा अभ्यास विषय आहे. सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी अर्थव्यवस्थेत दीर्घकाळात कोणत्याही प्रकारच्या हस्तक्षेपाशिवाय सक्षम बाजार यंत्रणेकडून पूर्ण रोजगार अवस्था प्राप्त होते असे विश्लेषण केले आहे. परंतु संपूर्ण सनातनवादी अर्थशास्त्राचा ढाचा १९२९ च्या महामंदीने ढासळला. सनातनवादी अर्थशास्त्राला झिडकारून केन्स यांनी 'रोजगाराचा सामान्य सिद्धान्त' या ग्रंथात पूर्ण रोजगार कसा साध्य करता येईल याचे विश्लेषण केले आहे. थोडक्यात, पूर्ण रोजगार आणि उत्पादनाचे सिद्धान्त हे स्थूल अर्थशास्त्राचे मूलभूत सिद्धान्त आहेत.

3. चलनवाढ आणि सामान्य किंमत पातळी :

SBMPAGURUNAGAR Bus. Economics Dept.

कोणत्याही अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकासाच्या गतीबरोबर त्या देशातील सामान्य किंमत पातळी राहील याची काळजी घेतली जाते. आर्थिक विकास आणि सामान्य किंमत पातळी यांचे संतुलन कसे साधता येईल याचा अभ्यास स्थूल अर्थशास्त्रात केला जातो. महागाई म्हणजेच चलनवाढीची व्याख्या करणे तिच्या कारणांचा शोध घेणे आणि त्यावर नियंत्रण कसे ठेवता येईल यासंबंधीचे धोरण आखणे हा स्थूल अर्थशास्त्राचा अभ्यास विषय आहे. एकूण मागणी आणि एकूण पुरवठा यांच्यातील संतुलनाच्या अनुषंगाने किंमत पातळी महत्त्वाची भूमिका बजावते. अर्थव्यवस्थेतील चलनवाढीचे प्रमाण वाढत असताना स्थूल अर्थशास्त्र उद्दिष्टे साध्य करणे जिकि रीचे होते. याकरिता किंमत नियंत्रण हा महत्त्वाचा मुद्दा आहे. जे. एम. केन्स यांनी चलनवाढीचा सिद्धान्त मांडून त्यावर नियंत्रण कसे ठेवता येईल यासंबंधीचे वि श्लेषण केले आहे. केन्स यांच्यानंतर अनेक अर्थशास्त्रज्ञांनी चलनवाढीसंबंधीच्या सिद्धान्ताची मांडणी करून या समस्येची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत.

4. आर्थिक वृद्धी आणि स्थैर्य:

अर्थशास्त्रामध्ये विकासाचे अर्थशास्त्र ही एक स्वतंत्र शाखा आहे. यामध्ये अर्थव्यवस्थेच्या गतिशील विकासासाठी कोणत्या प्रकारची आर्थिक नीती अधिक साहाय्यभूत ठरेल याची मांडणी केली जाते. विकासाचे अर्थशास्त्र हा स्थूल अर्थशास्त्राचा अभ्यास विषय आहे. दीर्घकालीन आर्थिक उद्दिष्टे निश्चित झाल्यानंतर ती साध्य करण्यासाठी देशातील उपलब्ध संसाधने आणि विकासाचा दर्जा यानुसार आपणास पुढील वाटचाल कोणत्या दिशेने करणे गरजेचे आहे याचा अभ्यास स्थूल अर्थशास्त्रात केला जातो. आर्थिक विकास प्रतिमांची मांडणी करून अर्थशास्त्रज्ञ अर्थव्यवस्थेच्या विकासाची दिशा ठरवत असतात. जसे हेरॉल्ड डोमर यांचे प्रतिमान, सोलो यांचे प्रतिमान. आर्थिक वृद्धी आणि आर्थिक विकास या दोन संकल्पनांमधील फरक लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. आर्थिक वृद्धी ही संख्यात्मक संकल्पना असून विविध आर्थिक घटकांमध्ये वाढ होणे यामध्ये अपेक्षित आहे. जसे राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ, वेतनदरातील वाढ, उपभोग खर्चातील वाढ इत्यादी. आर्थिक विकास म्हणजे लोकांच्या राहणीमानाच्या दर्जातील उच्चस्तरीय बदल होय. देशातील नागरिकांच्या जीवनात गुणात्मकबदल होणे म्हणजे आर्थिक विकास होणे होय. स्थूल अर्थशास्त्रामध्ये आर्थिक विकास आणि वृद्धी यासंबंधीचा अभ्यास केला जातो.

5. पैशाचे मूल्य:

पैशाचे मूल्य हा अर्थशास्त्रातील अतिशय वादग्रस्त प्रश्न आहे. पैशाचे मूल्य म्हणजे चलनाची खरेदी शक्ती होय. वस्तू आणि सेवांच्या वाढत्या कि मतीबरोबर चलनाची खरेदी

SBM RAJGURUNAGAR Bus. Economics Dept.

शक्ती कमी होत जाते. म्हणजेच किमती आणि पैशाचे मूल्य यामध्ये व्यस्त संबंध असतो. पैशाच्या मूल्यावर परिणाम करणाऱ्या विविध घटकांचा अभ्यास करणे आणि त्या अनुषंगाने पैशाचे मूल्य स्थि र कसे राखता येईल याचा शोध घेणे हा स्थूल अर्थशास्त्राचा अभ्यासाचा विषय आहे.

पैशाच्या मूल्यासंबंधीचा संख्यात्मक सिद्धान्त अर्व्हिंग फिशर यांनी १९११ मध्ये पहिल्यांदा मांडला. यामध्ये फिशर यांनी पैशाच्या मूल्यावर परिणाम करणाऱ्या घटकांमध्ये पैशाचा पुरवठा आणि उत्पन्न पातळी यांची भूमिका महत्त्वाची असते अशी मांडणी केली. फिशर यांच्या मते पैशाचा पुरवठा आणि पैशाचे मूल्य यामध्ये व्यस्त आणि प्रमाणशीर संबंध असतो. या नंतरच्या अनेक अर्थशास्त्रज्ञांनी पैशाच्या मूल्यासंबंधीचे अनेक सिद्धान्त मांडले आहेत. फिशरच्या या सिद्धान्तावर टीका करून केन्स यांनी पैशाच्या मागणीची भूमिका स्पष्ट केली. कोणत्याही अर्थव्यवस्थेसाठी पैशाचे मूल्य स्थिर राखणे अतिशय महत्त्वाचेअसते. पैशाच्या मूल्यामध्ये जर अस्थिरता आली तर लोकांचा चलनावरील विश्वास उडतो आणि अर्थव्यवस्थेमध्ये अनागोंदी निर्माण होते.

6. व्यापार चक्र :

जगातील अनेक भांडवलशाही अर्थव्यवस्थेने अनेक प्रकारच्या व्यापार चक्राचा अनुभव घेतलेला आहे. व्यापार चक्र म्हणजे उत्पादन आणि रोजगार यांच्यामध्ये ठराविक कालावधीनंतर येणारे चढ-उतार होय. व्यापार चक्रामध्ये प्रामुख्याने चार अवस्था असतात. त्यापैकी तेजी आणि मंदी या दोन प्रमुख टोकाच्या अवस्था आहेत. कोणत्याही अर्थव्यवस्थेला आर्थिक घसरण आणि मंदी परवडत नाही. अमेरिकेत आलेल्या १९२९ च्या जागतिक महामंदीने तिचे भयानक रूप जगाला दाखवून दिले. महामंदीचा केवळ आर्थिक परिणाम असून त्यामुळे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय इत्यादी भयंकर परिणाम संपर्णू मानवजातीला सोसावे लागतात. व्यापारचक्र येऊ नये म्हणून प्रत्येक अर्थव्यवस्था खबरदारी घेत असते. व्यापार चक्राची निर्मिती कोणत्या कारणांमधून होत असते, याचा शोध घेऊन त्यावर नियंत्रण मिळविणे हा स्थूल अर्थशास्त्राचा अभ्यास विषय आहे. अलीकडच्या काळात म्हणजेच २००८ मध्ये आलेल्या आर्थिक घसरणीमुळे जगातील अनेक अर्थव्यवस्थांनी धडा घेतलेला आहे. विविध प्रकारच्या व्यापार चक्रांच्या कारणांचा शोध घेणे, त्यांच्या वर्तनाचा अभ्यास करणे, त्यांचे परिणाम अभ्यासणे हे स्थूल अर्थशास्त्राचा अभ्यास विषय आहेत.

7. आंतरराष्ट्रीय व्यापार:

जगातील प्रत्येक अर्थव्यवस्था कमी-अधि क प्रमाणात आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी असते. उपभोग्य वस्तूं ची आयात आणि निर्या त करणे आणि त्यातून

SBM RAJGURUNAGAR Bus. Economics Dept.

अर्थव्यवस्थेच्या विकासाला हातभार लावणे हा जसा कोणत्याही अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा भाग असतो त्याचप्रमाणे भांडवली वस्तू आणि तंत्रज्ञान यांच्या आयात-निर्याती द्वारे अर्थव्यवस्थेला स्वावलंबी बनविणे महत्त्वाचे असते. आंतरराष्ट्रीय व्यापारावर अनेक घटकांचा परिणाम होतो. जसे, देशातील संसाधनांची उपलब्धता, तंत्रज्ञानाचा दर्जा, भांडवलाची उपलब्धता, देशादेशांमधील आर्थिक आणि राजकीय संबंध, उत्पादनाची गुणवत्ता, इत्यादी. आंतरराष्ट्रीय व्यापारातील संधींचा शोध घेऊन त्याचा देशाच्या आर्थिक विकासात कसा उपयोग करून घेता येईल यासंबंधीची मांडणी आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रात केली जाते. आयात आणि निर्या तीवर परिणाम करणाऱ्या अनेक घटकांचा अभ्यास आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रात केला जातो. आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र हे स्थूल अर्थशास्त्र याचाच एक भाग आहे. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धान्ताची मांडणी करणे आणि देशा-देशातील व्यापारावर अनुकूल आणि प्रतिकूल परिणाम करणाऱ्या घटकांचा शोध घेणे हे स्थूल अर्थशास्त्राच्या अभ्यासाचा विषय आहेत.

8. व्यवहारतोल आणि विनिमय दर:

अर्थव्यवस्थेतील उपभोग्य वस्तू आणि सेवा तसेच भांडवली वस्तू आणि सेवा यांच्या जगातील सर्व देशांत बरोबर झालेल्या देवाण-घेवाणीचा लेखाजोखा म्हणजे व्यवहारतोल होय. व्यवहारतोलामध्ये अर्थव्यवस्थेचे इतर अर्थव्यवस्थांबरोबर झालेले सर्व प्रकारचे व्यवहार नोंदविले जातात. उपभोग्य वस्तू आणि सेवा यांची नोंद ज्या खात्यावर केली जाते. त्याला चालू खाते असे म्हणतात. चालू खात्यावरील व्यवहार व्यापारतोल म्हणून ओळखले जातात. भांडवली वस्तू आणि सेवांची आयात-निर्यात भांडवली खात्यावर नोंदविली जाते. चालू खात्यावर आधिक्य राखून त्याचा उपयोग भांडवली खात्यावरील तूट भरून काढण्यासाठी करावा अशी मांडणी विकसनशील अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून केली जाते. विनिमय दर म्हणजे वेगवेगळ्या देशांच्या चलनामधील देवाण-घेवाणीचा दर होय. जसे अमेरिकन डॉलर आणि भारतीय रुपया यांच्यातील विनिमय दर. तसेच अमेरिकन डॉलर आणि युरोपियन युरो यांच्यातील विनिमय दर. विनिमय दरात स्थैर्य राखणे किंवा देशी चलनाचे मूल्य वाढविणे आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीने त्या देशासाठी महत्त्वाचे असते. प्रत्येक देश या दृष्टीने प्रयत्न करीत असतो. यासंबंधीच्या सिद्धान्ताची मांडणी करणे आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराचा अभ्यास करणे हे स्थूल अर्थशास्त्राच्या कक्षेतील काम आहे.

9. आर्थिक धोरणे:

अर्थव्यवस्थेतेमध्ये सरकारची कोणत्याही प्रकारची भूमिका असू नये अशी मांडणी सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी केलेली होती. सरकारी हस्तक्षेपाशिवाय सक्षम बाजार यंत्रणेच्या

SRMPRAGURUNAGAR Bus. Economics Dept.

मदतीने दीर्घकालीन आर्थिक उद्दिष्टे साध्य होतात आणि अर्थव्यवस्था पूर्ण रोजगार पातळीला पोचते अशी मांडणी त्यांनी केली. परंतु जागतिक महामंदीने या अर्थशास्त्राला अपयशी ठरले. यानंतर केन्स यांनी सरकारी हस्तक्षेप आणि आर्थिक धोरणे यांची अर्थव्यवस्थेच्या संतुलनासाठीची आवश्यकता स्पष्ट केली. मौद्रिक आणि राजकोषीय धोरणाच्या माध्यमातून सरकारने अर्थव्यवस्थेमध्ये हस्तक्षेप करावा आणि आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठीची नीती अवलंबवावी अशी मांडणी त्याने केली. मौद्रिक धोरणाच्या मांडणीसाठी आणि अंमलबजावणीसाठी प्रत्येक देशात मध्यवर्ती बँक असणे गरजेचे आहे असे केन्स यांनी सुचविले. आज जगातल्या प्रत्येक अर्थव्यवस्थेत मध्यवर्ती बँक आहे आणि त्या बँकेकडून मौद्रिक धोरणाची आखणी केली जाते आणि अंमलबजावणी देखील केली जाते. आर्थिक धोरणांची मांडणी करणे, त्याचे मूल्यमापन करणे हे स्थूल अर्थशास्त्राचे महत्त्वाचे काम आहे.

अर्थव्यवस्थेच्या समग्र पातळीवर निर्माण होणाऱ्या विविध समस्यांचा अभ्यास करणे, त्या सोडविण्यासाठीची उपाययोजना सुचविणे, विविध आर्थिक चलांच्या वर्तनाचा अभ्यास करणे आणि त्यातील परस्पर संबंध तपासणे, कालानुरूप बदलणाऱ्या स्थितीचा आढावा घेऊन त्यानुसार विविध सिद्धान्तांचे मूल्यमापन करणे आणि नवीन सिद्धान्ताची मांडणीकरणे या स्थूल अर्थशास्त्राच्या कक्षेतील बाबी आहेत.

SBM RAJGURUNAGAR Bus. Economics Dept.

1.2.4. स्थूथूल अर्थशास्त्राचे महत्त्व:-

1. अर्थव्यवस्थेच्या कार्यप्रणालीचे आकलन:

अर्थव्यवस्थेचे कार्यान्वयन कसे चालते याचे आकलन स्थूल अर्थशास्त्राच्या अभ्यासातून मिळते. सूक्ष्म अर्थशास्त्रातील सिद्धान्त आणि तत्त्वे स्थूल अर्थशास्त्रासाठी लागू करता येत नाहीत. अर्थव्यवस्थेतील विविध आर्थिक घटक जसे राष्ट्रीय उत्पन्न, एकूण रोजगार, सामान्य किंमत पातळी, एकूण उत्पादन, एकूण पुरवठा स्वतंत्रपणे काम करीत असतात. या आर्थिक घटकांचा सूक्ष्म अर्थशास्त्रातील अभ्यास अर्थव्यवस्थेच्या समग्र पातळीवर लागू करताना मर्यादा येतात. विविध आर्थिक घटकांमधील परस्पर संबंध आणि त्याचे समग्र पातळीवरील वर्तन हे त्याच्या वैयक्तिक पातळीवरील वर्तन अपेक्षा असते. प्रोफेसर बोर्डिंग यांनी सांगितल्याप्रमाणे एका वृक्षाचा अभ्यास करणे आणि त्यातून आलेले निष्कर्ष संपूर्ण जंगलासाठी लागू करणे योग्य नसते. अगदी त्याचप्रमाणे एका आर्थिक घटकांच्या वैयक्तिकतेचा अभ्यास आणि त्यातून आलेले निष्कर्ष त्यांच्या समग्र पातळीवर लागू करणे चुकीचे ठरते. व्यक्तिगत उपभोक्त्या च्या वर्तनावरून संपूर्ण उपभोक्त्यां च्या वर्तनाचा निष्कर्ष काढता येत नाही. यासाठी स्थूल अर्थशास्त्राचा स्वतंत्रपणे अभ्यास करणे गरजेचे असते.

2. व्यापारचक्रांच्या आकलनासाठी:

भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये व्यापारचक्रे नियमितपणे येत असतात. व्यापाराचा अभ्यास आणि कारणमीमांसा अर्थव्यवस्थेच्या समग्र पातळीवर होणे गरजेचे आहे. केन्स यांनी अर्थव्यवस्थेतील एकूण मागणीच्या कमतरतेमुळे निर्माण होणारी मंदी कशी दूर करता येईल यासाठी अर्थव्यवस्थेच्या पातळीवर विविध उपाय सुचविले आहेत. अर्थव्यवस्थेमध्ये विविध आर्थिक घटकांच्या मदतीने आणि काही गणितीय प्रक्रियांच्या मदतीने अर्थव्यवस्थेतील मंदी दूर करता येणे शक्य आहे. अर्थव्यवस्थेचे चक्र सुरळीतपणे चालण्यासाठी आणि व्यापार चक्रावर नियंत्रण मिळविण्यासाठी मौद्रिक आणि राजकोषीय धोरणाची अंमलबजावणी कशी करता येईल याचा अभ्यास स्थूल अर्थशास्त्रात केला जातो. गुणक आणि प्रवेग तत्त्वाच्या मदतीने अर्थव्यवस्थेला मंदीच्या स्थितीतून बाहेर कसे काढता येईल याचे विश्लेषण केन्स यांनी दिल्यामुळे अर्थव्यवस्थेतील व्यापार चक्रावरील नियंत्रणाला मदत मिळाली. स्थूल अर्थशास्त्र या अभ्यासामुळे अर्थव्यवस्थेमध्ये येणारी स्थित्यंतरे, व्यापारचक्रे आणि आर्थिक विकासाची गती यांचे आकलन होण्यास मदत होते.

3. आर्थिक विकास वाढविण्यासाठी:

आर्थिक विकासाची गती वाढविणे आणि वाढविलेल्या गतीमध्ये सातत्य राखणे हे कोणत्याही देशासमोरील महत्त्वाचे आव्हान असते. अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये कोणत्या घटकांचे योगदान किती प्रमाणात आहे याचे आकलन स्थूल अर्थशास्त्राच्या अभ्यासातून होते. वस्तू आणि सेवा यांच्या उत्पादनात होणारा बदल, गुंतवणुकीत होणारा बदल, एकूण मागणी आणि पुरवठ्यातील बदल अर्थव्यवस्थेच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावत असतात. गुंतवणुकीतील बदलामुळे राष्ट्रीय उत्पन्नात होणारा बदल गुणक तत्त्वाच्या मदतीने लक्षात येतो. स्थूल अर्थशास्त्रामध्ये विविध आर्थिक घटकांमधील परस्पर संबंध आणि सरकारच्या हस्तक्षेपामुळे आवश्यक ते घडवून आणता येणारे अपेक्षित बदल यामुळे अर्थव्यवस्थेच्या विकासाची गती वाढते. स्थूल अर्थशास्त्रामुळे आर्थिक विकासाची दिशा आणि त्याची व्यापकता समजून घेण्यास मदत होते. भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये कोणत्या प्रकारच्या आर्थिक विकासाचे प्रति मान लागू करणे योग्य ठरेल यासंबंधीचा निर्णय स्थूल अर्थशास्त्राच्या अभ्यासातून निश्चित करता येतो. अर्थव्यवस्थेतील मूलभूत समस्या सोडविण्यासाठी दारिद्रय, बेरोजगारी आणि स्थूल अर्थशास्त्राच्या अभ्यासाची मदत होते.

4. आर्थिक धोरणांच्या निर्मितीसाठी:

सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी अर्थव्यवस्थेमध्ये कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करू नये, अशी भूमिका घेतलेली असल्याने तत्कालीन परिस्थितीत कोणत्याही प्रकारच्या

SBM RAJGURUNAGAR Bus. Economics Dept.

आर्थिक धोरणांच्या निर्मितीचा संबंधच नव्हता. १९२९ च्या आर्थिक महामंदीनंतर संपूर्ण जगाला सरकारच्या हस्तक्षेपाची गरज लक्षात आली. आवश्यकता असेल तेथे सरकारने मौद्रिक आणि राजकोषीय धोरणाच्या माध्यमातून हस्तक्षेप करावा आणि अर्थव्यवस्थेतील चढ-उतारावर नियंत्रण ठेवावे अशी मांडणी जे. एम. केन्स यांनी केली. सरकारी हस्तक्षेपाशिवाय स्थूल अर्थशास्त्र उद्दिष्टे साध्य करणे अशक्य आहे आणि तसेच अर्थव्यवस्थेतील मंदीसदृश परिस्थिती दूर करणे अशक्य आहे अशी मांडणी त्यांनी आपल्या 'रोजगाराचा सामान्य सिद्धान्त' या ग्रंथात केली. यानंतर जगातील विविध देशांमध्ये मौद्रिक धोरणाच्या निर्मिती आणि अंमलबजावणीसाठी मध्यवर्ती बँकेची स्थापना करण्यात आली. पैशाच्या पुरवठ्यात आणि बाजारातील तरलतेमध्ये गरजेप्रमाणे बदल करून मध्यवर्ती बँक मौद्रिक धोरणाची आखणी आणि अंमलबजावणी करते. राजकोषीय धोरणाची आखणी आणि अंमलबजावणी करण्यासाठी सरकारकडे स्वतंत्र खाते निर्माण करण्यात आले. कर, सार्वजनिक कर्ज, सार्वजनिक खर्च इत्यादीच्या माध्यमातून सरकार अर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक धोरणाच्या माध्यमातून हस्तक्षेप करीत असते. स्थूल अर्थशास्त्राच्या अभ्यासातून आर्थिक धोरणाची निर्मिती आणि त्याची अंमलबजावणी व मूल्यमापन करण्यास मदत मिळते.

5. व्यावसायिक उपयोग :

स्थूल अर्थशास्त्र अर्थव्यवस्थेतील सार्वजनिक आणि खासगी क्षेत्राची भूमिका अभ्यासते. अर्थव्यवस्थेच्या विकासात दोन्ही क्षेत्रांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याने त्या भूमिका एकमेकांना पूरक असल्या पाहिजेत. सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणुकीचे प्रमाण वाढल्याने खासगी गुंतवणुकीवर त्याचा प्रतिकूल परिणाम होता कामा नये याची दक्षता घ्यावी लागते. सार्वजनिक क्षेत्रातील वस्तू आणि सेवांचे उत्पादन वाढल्याने त्याचा खासगी उत्पादकांवर प्रतिकूल परिणाम होता कामा नये याची दक्षता घ्यावी लागते. म्हणजेच अर्थव्यवस्थेतील खासगी व्यावसायिकांच्या दृष्टिकोनातून स्थूल अर्थशास्त्र अभ्यास करीत असते. स्थूल अर्थशास्त्राच्या अभ्यासातून आलेले निष्कर्ष, मांडण्यात आलेले सिद्धान्, भाकिते इत्यादीचा उपयोग खासगी व्यावसायिक त्यांच्या व्यावसायिक उपयोगासाठी करीत असतात. अर्थव्यवस्थेतील आर्थिक विकासाची स्थिती लक्षात घेऊन आणि भविष्यातील मागणी आणि गुंतवणूक किती असेल यासंबंधीचा अंदाज बांधून खासगी व्यावसायिक त्यांच्या गुंतवणुकीचा आणि उत्पादनाचा निर्णय घेत असतात. यासाठी स्थूल अर्थशास्त्र त्यांना मदत करते.

6. स्थूल अर्थशास्त्रीय समस्यांच्या आकलनासाठी :

स्थूल अर्थशास्त्राचा संबंध अर्थव्यवस्थेच्या समग्र पातळीवरील समस्यांशी असतो. भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये दारिद्र्य, बेरोजगारी, उत्पन्न विषमता, प्रादेशिक

SBM RAJGURUNAGAR Bus. Economics Dept.

विषमता यांसारख्या समस्या असतात. या समस्या सोडविण्यासाठी स्थूल अर्थशास्त्रामध्ये त्यांचा अभ्यास केला जातो. या समस्या सोडविण्यासाठी कोणत्या प्रकारच्या आर्थिक धोरणाचा अवलंब करणे गरजेचे आहे, यासंबंधीचा अभ्यास स्थूल अर्थशास्त्रामध्ये केला जातो. उत्पन्न आणि प्रादेशिक विषमता दूर करण्यासाठी कोणत्या प्रकारचे गुंतवणूक धोरण उपयुक्त ठरेल, यासंबंधीचा अभ्यास स्थूल अर्थशास्त्रामध्ये केला जातो.

7. चलनवाढ आणि चलनघट :

सामान्य किंमत पातळीत होणारी वाढ म्हणजे चलनवाढ होय. आणि याउलट परिस्थितीत म्हणजेच सामान्य किंमत पातळीत होणारी घट चलनघट म्हणून ओळखली जाते. चलनवाढ आणि चलनघट या स्थूल अर्थशास्त्रातील अतिशय महत्त्वाच्या बाबी आहेत. चलनवाढीमुळे अर्थव्यवस्थेत अनेक प्रकारच्या अडचणी निर्माण होतात. वेगवेगळ्या उत्पन्न गटांतील लोकांवर त्याचे वेगवेगळे परिणाम होतात. अल्प उत्पन्न गटातील लोकांवर चलनवाढीचा भयंकर परिणाम होतो. चलनवाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणत्या साधनांचा उपयोग केला जाऊ शकतो याचा अभ्यास स्थूल अर्थशास्त्रामध्ये केला जातो. किंमत स्थैर्य हे स्थूल अर्थशास्त्राचे महत्त्वा चे उद्दिष्ट आहेत. चलनवाढीमुळे लोकांच्या खरेदीशक्ती मध्ये घट होते. पैशाचे मूल्य कमी होते. परिणामी, त्याचे सामाजिक, राजकीय परिणाम होतात. चलनघटीच्या परिस्थितीत वस्तूंच्या किमती कमी होत असल्याने लोकांच्या वास्तव उत्पन्नात वाढ होते. चलनघट या दोन्हींवर नियंत्रण असणे गरजेचे असते.

8. आर्थिक घटकांचे वर्तन आणि परस्परसंबंध यांचा अभ्यास :

सूक्ष्म अर्थशास्त्रामध्ये अभ्यासल्या जाणाऱ्या विविध आर्थिक घटकांच्या वैयक्तिकतेला अर्थव्यवस्थेच्या समग्र पातळीवर लागू करता येत नसल्याने त्यांचा स्वतंत्र अभ्यास त्यांच्या समग्र पातळीवर करणे गरजेचे ठरते. चलनवाढीचा परिणाम राष्ट्रीय उत्पन्नावर कशा पद्धतीने होतो, नाममात्र राष्ट्रीय उत्पन्न आणि वास्तव राष्ट्रीय उत्पन्नातील फरक, सार्वजनिक गुंतवणुकीचा खासगी गुंतवणुकीवर कोणता परिणाम होतो इत्यादी बाबींचा अभ्यास स्थूल अर्थशास्त्रात केला जातो. विविध आर्थिक घटकांच्या वर्तनाचा अभ्यास आणि त्यांच्यातील परस्पर संबंधाचा अभ्यास केल्याने अर्थव्यवस्थेतील विविध समस्यांची सोडवणूक करणे सहज शक्य होते. तसेच आर्थिक विकासाचा दर वाढविणे शक्य होते. राष्ट्रीय उत्पन्न, रोजगार, एकूण मागणी आणि पुरवठा, महागाई, व्यापार चक्रे इत्यादी घटकांचा अभ्यास आणि त्यांच्यातील परस्पर संबंधाचा अभ्यास कोणत्या शास्त्रात केला जातो.

9. धोरणाचे मूल्यमापन:

SBM RAJGURUNAGAR Bus. Economics Dept.

कोणत्याही आर्थिक धोरणाच्या मूल्यमापन प्रक्रियेतून त्याची फलनिष्पत्ती समजून घेण्यास मदत होते. आर्थिक धोरणांची आखणी, अंमलबजावणी आणि मूल्यमापन करणे. अतिशय महत्त्वाचे असते. स्थूल अर्थशास्त्रामध्ये आर्थिक धोरणाच्या आखणीपासून ते त्याच्या मूल्यमापनापर्यंतचा अभ्यास केला जातो. आर्थिक धोरणाच्या मूल्यमापनातून त्यात राहिलेल्या त्रुटी लक्षात येतात व पुढील धोरण आखण्यासाठी त्याची मदत होते. आर्थिक भरभराटीच्या काळात आणि याउलट आर्थिक मंदीच्या काळात टाकण्यात आलेल्या धोरणाचे मूल्यमापन करून भविष्यातील आर्थिक चढ-उतारावर नियंत्रण मिळविणे शक्य होते. अर्थशास्त्र आर्थिक धोरणाचे मूल्यमापन केले जाते.

10. राष्ट्रीय उत्पन्नाचा अभ्यास :

राष्ट्रीय उत्पन्नाची व्याख्या करणे, राष्ट्रीय उत्पन्नाच्या विविध संकल्पना विशद करणे, राष्ट्रीय उत्पन्न मापनाच्या पद्धती विकसित करणे, मोजमापातील अडचणींचा शोध घेऊन त्या दूर करण्याचा प्रयत्न करणे हे स्थूल अर्थशास्त्राचे काम आहे. कोणत्याही देशाच्या उत्पादनाचे मोजमाप करणे अतिशय महत्त्वाचे असते. राष्ट्रीय उत्पन्नाच्या मोजमापातून अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांचे योगदान लक्षात येते. राष्ट्रीय उत्पन्नाच्या मदतीने आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत तुलना करणे शक्य होते. स्थूल अर्थशास्त्रामध्ये राष्ट्रीय उत्पन्नाचा सखोल अभ्यास केला जातो.

SBMPAIGURUNAGAR Bus. Economics Dept.

1.2.5 स्थूल अर्थशास्त्राच्या मर्यादा :-

1. चलांचे एकत्रीकरण एकजिनसी नसते:

स्थूल अर्थशास्त्रामध्ये वैयक्तिक आर्थिक चलाचे एकत्रीकरण करून त्यापासून समग्र आर्थिक चल विकसित केले जाते. देशातील लोकांच्या वैयक्तिक उत्पन्नाची बेरीज करून राष्ट्रीय उत्पन्न काढले जाते. याप्रमाणेच देशातील लोकांकडून केल्या जाणाऱ्या वस्तू आणि सेवांच्या मागणीचे एकत्रीकरण करून एकूण मागणीचे मोजमाप केले जाते. राष्ट्रीय उत्पन्न असो अथवा एकूण मागणी यांचे वैयक्तिक पातळीवरील स्वरूप आणि वर्तन तसेच समग्र पातळीवरील स्वरूप आणि वर्तन भिन्न भिन्न असते. राष्ट्रीय उत्पन्नामध्ये अर्थव्यवस्थेतील वेगवेगळ्या क्षेत्रातील, वेगवेगळ्या प्रदेशातील लोकांच्या उत्पन्नाचा समावेश होतो. या सर्वांची एकत्रित बेरीज करून जरी आपण राष्ट्रीय उत्पन्न काढले तरी त्याचे स्वरूप एकजिनसी नसते. वैयक्तिक उपभोक्त्याच्या उत्पन्न पातळीवरून त्या उत्पन्नाची विभागणी अथवा वर्तन ठरत असते. परंतु राष्ट्रीय उत्पन्नाची पातळी वाढल्यामुळे वैयक्तिक उपभोक्त्याच्या उत्पन्नाची पातळी त्यामध्ये दिसून येत नाही. याप्रमाणेच एकूण मागणीमध्ये देशातील सर्व प्रकारच्या वस्तू आणि सेवांचा समावेश होतो. एकूण मागणीमध्ये कोणत्याही

प्रकारच्या वस्तू आणि सेवा वेगवेगळ्या स्वरूपात दिसून येत नाहीत. ही स्थूल अर्थशास्त्राची मर्यादा आहे. स्थूल अर्थशास्त्र समग्र पातळीवर अभ्यास करीत असल्याने आर्थिक चलाचे एकत्रीकरण करून त्याचे समग्र रूप लक्षात घेतले जाते. परंतु ते एकजिन सी असेलच असे सांगता येत नाही.

2. अति सामान्यीकरण:

अर्थव्यवस्थेतील विविध आर्थिक घटक एकत्रित करून त्याचे सामान्यीकरण केले जाते. जसे एकूण उत्पादन, एकूण रोजगार, एकूण निर्यात इत्यादी. आर्थिक चलाचे एकत्रीकरण करीत असताना त्यामधील विविध ता लक्षात घेतली जात नाही. त्यामुळे आर्थिकतेचे एकत्रीकरण हे अति सामान्य होते. कोणत्याही आर्थिक चलाचे एकत्रीकरण करीत असताना त्याचा अर्थ बदलता कामा नये. अन्यथा त्यातून येणारे निष्कर्ष चुकीचे ठरू शकतात. प्रा. बोल्डिंग यांनी एका उदाहरणाच्या साहाय्याने अति सामान्यीकरण संकल्पना समजावून सांगितली आहे. दोन सफरचंद अधिक तीन सफरचंद बरोबर पाच सफरचंद. एकूण पाच सफरचंद याला निश्चित अर्थ आहे. दोन सफरचंद अधिक तीन संत्रे बरोबर पाच फळे. एकूण पाच फळे यालाही काही प्रमाणात अर्थ आहे. परंतु जर दोन सफरचंद आणि तीन मोटारसायकली बरोबर पाच वस्तू . या पाच वस्तूंना कोणताही अर्थ प्राप्त होत नाही. अर्थव्यवस्थेतील एकूण उत्पादन पाच वस्तूंचे झालेले आहे असे म्हणणे म्हणजे अर्थहीन विश्लेषण होईल. स्थूल अर्थशास्त्रामध्ये अशा प्रकारचे एकत्रीकरण करून आर्थिक चलाचे अति सामान्यीकरण केले जाते.

3. निष्कर्ष दिशाभूल करणारे असतात:

समग्र आर्थिक अचलाच्या अभ्यासातून काढण्यात आलेले निष्कर्ष काही वेळेला दिशाभूल करणारे असतात. सामान्य किंमत पातळीत होणारी वाढ म्हणजे चलनवाढ होय, अशी महागाईची व्याख्या स्थूल अर्थशास्त्रात केली जाते. महागाईचा प्रतिकूल परिणाम होतो. असा सर्वसाधारण निष्कर्ष आपणास काढता येतो. परंतु महागाईमुळे उत्पादक आणि विक्रेत्यांना मोठ्या प्रमाणात लाभ मिळतो आणि उपभोक्त्यांने व सामान्य नागरिकांना त्याची झळ सहन करावी लागते. त्यामुळे महागाईचा कोणताही एक निश्चित परिणाम होतो असे आपणास ठामपणे सांगता येत नाही. म्हणून स्थूल अर्थशास्त्र यातील बहुतांश निष्कर्ष दिशाभूल करणारे असू शकतात, अशी टीका स्थूल अर्थशास्त्रावर केली जाते. याबरोबरच समग्र आर्थिक कलाच्या वर्तन यावरून मांडण्यात आलेले सिद्धान्त व्यक्तिगत पातळीवर लागू करता येत नाहीत. कोणत्याही एका ठेवीदारांनी बँकेतील ठेवी कोणत्याही वेळेला काढून घेणे यात काही चुकीचे अथवा बँक व्यवसायासाठी हानि कारक नाही. परंतु देशातील

SBMP RAJGURUNAGAR Bus. Economics Dept.

सर्व ठेवीदारांनी एकाच वेळेला ठेवी काढण्याचा प्रयत्न केला तर संपूर्ण बँक व्यवसाय बुडीत निघेल. एकंदरीत स्थूल अर्थशास्त्रातील निष्कर्ष हे समाजातील सर्वच घटकांवर सारख्याच प्रमाणात परिणाम करतील असे नसते.

4. संकल्पनात्मक आणि संख्याशास्त्रीय मर्यादा:

आर्थिक चलाच्या व्याख्या करणे आणि त्याचे वर्तन आणि परस्पर संबंधाचा अभ्यास करणे हे समग्रलक्षी अर्थशास्त्राचे प्रमुख स्वरूप आहे. परंतु आर्थिक चलाच्या व्याख्या आणि त्याच्या मोजमापाबद्दल अनेक अर्थशास्त्रज्ञां मध्ये मतभेद असल्याचे दिसून येते. जसे राष्ट्रीय उत्पन्नाची व्याख्या वेगवेगळ्या अर्थशास्त्रज्ञांनी वेगवेगळ्या दृष्टिकोनातून केलेली आहे. याबरोबरच राष्ट्रीय उत्पन्न मोजत असताना काही वस्तू आणि सेवांचा समावेश करणे यावरूनही अर्थशास्त्रज्ञांमध्ये मतभेद आहेत. पूर्ण रोजगाराची व्याख्या आणि त्याचे मोजमाप करण्यावरूनही अनेक देशांमध्ये वापरल्या जाणाऱ्या पद्धती आणि संकल्पना यामध्ये फरक असल्याचे दिसून येते. दारिद्र्याचे मोजमाप करताना देखील विविध देशांतील पद्धती आणि संकल्पना यात फरक आहे. संकल्पनात्मक अडचणींच्या बरोबरच काही संख्याशास्त्रीय अडचणींचा देखील समग्रलक्षी अर्थशास्त्र हा सामना करावा लागतो. आर्थिक चलाचे एकत्रीकरण करीत असताना त्यातील एकजिनसीपणा कमी होतो. तसेच सामान्य किंमत पातळीतील बदल मोजत असताना कोणत्या पद्धतीचा वापर करावा यामध्ये देखील अनिश्चितता असल्याचे दिसते. थोडक्यात, संकल्पनात्मक आणि संख्याशास्त्रीय मर्यादा लक्षात घेऊन समग्रलक्षी अर्थशास्त्राला आपला अभ्यास करावा लागतो.

5. वैयक्तिक चलांकडे दुर्लक्ष :

समग्रलक्षी अर्थशास्त्रामध्ये वैयक्तिक आर्थिक चलाकडे दुर्लक्ष केले जाते. वास्तविक पाहता आर्थिक चलनाच्या वैयक्तिकतेचा अभ्यास सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्रात केला जातो. आणि वैयक्तिक आर्थिक चलाच्या बेरजेतून तयार होणाऱ्या अर्थव्यवस्थेच्या पातळीवरील आर्थिक चलाचा अभ्यास समग्रलक्षी अर्थशास्त्रात केला जातो. परंतु असे करीत असताना वैयक्तिक आर्थिक चल दुर्लक्षित राहतात. एकूण मागणीचे मोजमाप करीत असताना काही वस्तूंच्या मागणीत अजिबात बदल होत नसला तरी त्याचे प्रतिबिंब अर्थव्यवस्थेच्या पातळीवर दिसत नाही. काही वस्तूंची मागणी सातत्याने घटत जाते हे सूक्ष्म अर्थशास्त्रातील अभ्यासाने आपणास दिसून येते.

6. चलांचे अनावश्यक एकत्रीकरण:

संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या पातळीवरील अभ्यास करण्यासाठी आर्थिक चलाचे एकत्रीकरण करणे सोयीचे असले तरी त्यातून सदोष निष्कर्ष निघू शकतात याकडे लक्ष देणे

SBM RAJGURUNAGAR Bus. Economics Dept.

गरजेचे आहे. राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ ज्या प्रमाणात होते त्याच प्रमाणात समाजातील सर्वच घटकांच्या उत्पन्नात वाढ होईल असे नसते. भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीमध्ये सेवा क्षेत्राचा वाटा अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. कृषी क्षेत्र मात्र अतिशय अल्प वेगाने वाढत असताना देखील अर्थव्यवस्थेचा एकंदरीत वाढीचा दर मात्र समाधानकारक असल्याचे दिसते. याचा अर्थ असा की सेवा क्षेत्राच्या वाढीमुळे आर्थिक विकासाचा दर मोठा दिसत असला तरी कृषी क्षेत्राची वाढ आणि राष्ट्रीय उत्पन्नातील त्याचा हिस्सा कमी असल्याने त्याचे प्रतिबिंब राष्ट्रीय पातळीवरील मानकामध्ये दिसत नाही. एकंदरीत आर्थिक अचलाच्या एकत्रीकरणासाठी आणि सुलभीकरण यासाठी स्थूल अर्थशास्त्रात अनावश्यक प्रयत्न केले जातात. यातून सदोष विश्लेषण आणि अनुमान काढण्याचा धोका निर्माण होतो.

7. सूक्ष्म पातळीवरील बदल दुर्लक्षित:

ग्राहक किंमत निर्देशांक आणि घाऊक किमतीचा निर्देशांक या किंमत पातळी मोजण्याच्या म्हणजेच महागाई मोजण्याच्या पद्धती आहेत. उपभोग्य वस्तू आणि सेवांच्या किमतीतील बदल लक्षात घेऊन ग्राहक किंमत निर्देशांक आणि घाऊक किमतीचा निर्देशांक काढला जातो. वस्तूंच्या किमतीतील बदल मोजण्यासाठी वस्तूच्या उपयोगानुसार त्याचे गटकरून त्यांना ठराविक भारांश दिले जातात. त्यावरून एका वर्षाच्या काळातील किमतीतील बदल मोजला जातो. वास्तविक बाजारात दिलेल्या कालावधीत सर्वच वस्तूंच्या किमती वाढतात असे नाही. काही वस्तूंच्या गुणवत्तेत वाढ होत जाते आणि किमती मात्र सापेक्षतः कमी होतात. इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंच्या बाबतीत आपणास असे म्हणता येते. आणि काही वस्तूंच्या किमती सातत्याने वाढत जातात. काही वस्तूंच्या कमी होत जाणाऱ्या किमती आणि काही वस्तूंच्या वाढत जाणाऱ्या कि मती याची सरासरी काढल्यास सामान्य किंमत पातळीत होणारा बदल अल्पसा दिसतो किंवा शून्य असतो. याबरोबरच ज्या वस्तूंचा भारांश अतिशय कमी आहे अशा वस्तूंच्या किमतीत मोठ्या प्रमाणात बदल झाले तरी त्याचे प्रतिबिंब सामान्य किंमत पातळीतील बदलांमध्ये दिसत नाही. थोडक्यात, सूक्ष्म पातळीवरील बदलाचे प्रतिबिंब समग्रलक्षी अर्थशास्त्र दुर्लक्षित राहते.

सूक्ष्म आणि स्थूल अर्थशास्त्र या आर्थिक चलाच्या विश्लेषणाच्या खरेतर दोन पद्धती आहेत. व्यक्तिगत पातळीवर आणि समग्र पातळीवर विविध आर्थिक घटकांचा अभ्यास करणे आणि गरजेनुसार योग्य पद्धतीचा वापर करून समस्यां ची सोडवणूक करणे हे अर्थशास्त्राचे मूलभूत काम आहे. ज्या पद्धतीने समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या मर्यादा आहेत तशाच सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्राच्याही काही मर्यादा आहेत. अर्थशास्त्राच्या ह्या दोन्ही शाखा एकमेकांना पूरक असून त्यामध्ये कोणतीही स्पर्धा नाही.

SBM RAJGURUNAGAR Bus. Economics Dept.

### 1.2.6 स्थूल अर्थशास्त्राची उद्दिष्टे:-

अर्थव्यवस्थेचे संतुलन अल्पकालीन आणि दीर्घकालीन स्वरूपाचे असते. कालावधीनुसार स्थूल अर्थशास्त्राची उद्दिष्टे निर्धारित केली जातात. महागाईवरील नियंत्रण हे अल्पकालीन उद्दिष्ट असते तसेच पूर्ण रोजगार हे दीर्घकालीन उद्दिष्ट असते. कोणत्याही अर्थव्यवस्थेची दीर्घकालीन उद्दिष्टे ही कमी-अधिक प्रमाणात एकसमान असतात. समग्रलक्षी अर्थशास्त्राची प्रमुख चार दीर्घकालीन उद्दिष्टे आहेत. अर्थव्यवस्थेची विकासाची पातळी आणि व्यावसायिक स्वरूपानुसार वेगवेगळ्या देशांतील समग्रलक्षी अर्थशास्त्राची उद्दिष्टे कमी-अधिक प्रमाणात भिन्न भिन्न असू शकतात. याचबरोबर उद्दिष्टांचा प्राधान्यक्रमदेखील वेगवेगळा असू शकतो. विकसित देशांतील स्थूल अर्थशास्त्रीय उद्दिष्टे आणि विकसनशील देशातील स्थूल अर्थशास्त्रीय उद्दिष्टे यात फरक असतो. भारतासारख्या विकसनशील देशातील प्रमुख स्थूल अर्थशास्त्राची उद्दिष्टे खालीलप्रमाणे सांगता येतात.

#### 1. पूर्ण रोजगार:

पूर्ण रोजगार म्हणजे देशातील सर्व रोजगारपात्र नागरिकांना त्यांच्या पात्रतेप्रमाणे आणि प्रचलित वेतनदराला रोजगार उपलब्ध असणे होय. पूर्ण रोजगार अवस्था प्राप्त करणे हे कोणत्याही अर्थव्यवस्थेसमोरचे महत्त्वाचे उद्दिष्ट असते. पूर्ण रोजगार अवस्था प्राप्त करण्यासाठी आणि अर्थव्यवस्थेच्या संतुलनासाठी वेगवेगळ्या प्रकारची आर्थिक धोरणे ओळख आखली जातात. पूर्ण रोजगार हे समग्रलक्षी अर्थशास्त्राचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. दीर्घकाळात अर्थव्यवस्थेत कोणत्याही सरकारी हस्तक्षेपाशिवाय पूर्ण रोजगार अवस्था साध्य होते. अशी मांडणी सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी केलेली होती. १९२९ च्या जागतिक महामंदीतून विकसित झालेल्या समग्रलक्षी अर्थशास्त्राने सरकारी हस्तक्षेपाची गरज स्पष्ट केली. मौद्रिक आणि राजकोषीय धोरणाच्या माध्यमातून सरकारने आवश्यकता असेल तेव्हा अर्थव्यवस्थेमध्ये हस्तक्षेप करावा आणि बाजारात संतुलन घडवून आणण्यास सहकार्य करावे अशी मांडणी जे. एम. केन्स यांनी केली. पूर्ण रोजगार अवस्था सरकारी हस्तक्षेपाशिवाय साध्य होऊ शकत नाही अशी मांडणी केन्स यांनी करून सरकारी हस्तक्षेपाची नितांत गरज असल्याचे स्पष्ट केले. पूर्ण रोजगार हे अर्थव्यवस्थेचे दीर्घकालीन उद्दिष्ट असते. प्रभावी मागणीच्या साह्याने एकूण मागणीत वाढ करीत गेल्यास अर्थव्यवस्था पूर्ण रोजगार अवस्थेला पोचते असे केन्स यांनी आपल्या रोजगार सिद्धान्तातून दाखवून दिले.

अलीकडच्या काळात अनेक अर्थव्यवस्थांमध्ये बेरोजगारीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात भेडसावत आहे. रोजगाराच्या संधी निर्माण करणे अतिशय गरजेचे आहेत. खासगी आणि सार्वजनिक गुंतवणुकीचे प्रमाण वाढवून आणि श्रमप्रधान तंत्रज्ञानाचा वापर करून

SBM RAJGURUNAGAR Bus. Economics Dept.

रोजगाराच्या संधी निर्माण करणे आवश्यक आहे. समग्रलक्षी अर्थशास्त्रातील अनेक वि कास प्रतिमाने रोजगाराच्या संधी कशा वाढवि ता येतील यासंबंधीचे वि श्लेषण करतात. विकसित आणि विकसनशील देशातील बेरोजगारीचे आणि रोजगाराच्या संरचनेचे स्वरूप भिन्न भिन्न असते. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये बेरोजगारीचे स्वरूप उघड आणि प्रच्छन्न आहे. छुप्या बेरोजगारीचेही मोठे प्रमाण विकसनशील राष्ट्रांमध्ये दिसून येते. मूलभूत आणि संरचनात्मक बदलाद्वारे रोजगाराच्या संधी निर्माण केल्या जाऊ शकतात. विकसित राष्ट्रांमध्ये चक्रीय बेरोजगारी असते आणि ती अल्पकालीन असते. स्थूल अर्थशास्त्रामध्ये रोजगारीच्या सिद्धान्तासंबंधी चर्चा केली जाते आणि पूर्ण रोजगार अवस्था प्राप्त करण्यासाठी धोरणे आखली जातात.

2. जलद आणि संतुलित आर्थिक विकास व वृद्धी :

आर्थिक विकास म्हणजे देशातील नागरिकांच्या राहणीमानाच्या दर्जा त होणारा गुणात्मक बदल होय. शिक्षण , आरोग्य, अन्नधान्याचे गुणवत्ता आणि उपलब्धता, वस्तू आणि सेवांची उपलब्धता आणि उपभोग यांच्यातील गुणात्मक बदलावरून आर्थिक विकास निर्धारित होतो. आर्थिक वृद्धी म्हण जे स्थूल अर्थशास्त्रीय चलामध्ये होणारा संख्यात्मक बदल होय. जसे राष्ट्रीय उत्पन्नात होणारी वाढ, दरडोई उत्पन्नात होणारी वाढ, गुंतवणुकीत होणारी वाढ इत्यादी. विकसनशील देशांमध्ये आर्थिक वृद्धीपेक्षा आर्थिक विकास अधिक महत्त्वाचा असतो. विकसित देशांमध्ये आर्थिक विकासाची पातळी गाठलेली असल्यामुळे आर्थिक वृद्धी महत्त्वाची असते. स्थूल अर्थशास्त्रामध्ये अर्थव्यवस्थेच्या जलद आणि संतुलित आर्थिक विकासावर भर दिला जातो. आर्थिक विकास आणि वृद्धी हे स्थूल अर्थशास्त्राचे दुसरे प्रमुख उद्दिष्ट आहे. आर्थिक वि कासाची गती वाढवि ण्यासाठी आणि वृद्धीचा दर वाढविण्यासाठी कोणत्या धोरणाचा अवलंब करणे आवश्यक आहे याची चर्चा स्थूल अर्थशास्त्रामध्ये केली जाते. वि कासाचे अर्थशास्त्र हा स्थूल अर्थशास्त्राचा एक स्वतंत्र भाग आहे. यामध्ये वेगवेगळी विकास प्रतिमाने मांडली जातात. अवलंबिण्यात आलेल्या विकास प्रतिमांचे मूल्यमापन केले जाते. त्यातील उणिवा निदर्शनास आणून दिल्या जातात.

अर्थव्यवस्थेच्या गरजेनुसार आर्थिक विकासाचे प्रतिमान विकसित केले जाते. संतुलित आर्थिक विकास याचा अर्थ देशाच्या सर्व प्रदेशाचा सम प्रमाणात होणे विकास असा आहे. याचबरोबर देशातील नागरिकांच्या वैयक्तिक विकासामध्ये मोठी तफावत असू नये असा अर्थ यामध्ये अभिप्रेत आहे. प्रादेशिक आणि उत्पन्न विषमता हा भारतासारख्या विकसनशील देशामध्ये मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. भारतातील काही राज्ये अधिक विकसित तर काही राज्ये मागासलेली आहेत. याबरोबरच देशातील नागरिकांच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात विषमता असल्याचे दिसून येते. समग्रलक्षी अर्थशास्त्रामध्ये यासंबंधीची चर्चा केली जाते आणि यावर उपाय सुचविले जातात. सार्वजनिक आणि खासगी मार्गाचा अवलंब

SBMP RAJGURUNAGAR Bus. Economics Dept.

करून प्रादेशिक समतोल विकास आणि वैयक्तिक उत्पन्न विषमता कमी करण्याचा प्रयत्न केला जातो. दीर्घकाळात संतुलित विकास साध्य करणे स्थूल अर्थशास्त्राचे उद्दिष्ट आहे.

3. आर्थिक स्थैर्य:

आर्थिक स्थैर्य म्हणजे उत्पादन आणि रोजगार यामध्ये असणारे सातत्य आणि निश्चित गती होय. भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये व्यापार चक्रनियमितपणे येत असतात. व्यापारचक्राच्या प्रमुख चार अवस्था आहेत. आर्थिक भरभराट किंवा तेजी ही पहिली अवस्था असून यानंतर आर्थिक घसरण सुरू होते. भरभराटीच्या अवस्थेवर नियंत्रण ठेवून अर्थव्यवस्था घसरण इकडे वळणार नाही याची दक्षता घेणे गरजेचे असते. जर अर्थव्यवस्था घसरणीकडे मार्ग क्रमणकरीत असेल तर वेळीच आवर घालून त्यातून पुन्हा भरभराटीकडे वळविणे आवश्यक असते. आर्थिक विकास आणि वृद्धीसाध्य करीत असताना उत्पादन आणि रोजगार यामध्ये जर मोठ्या प्रमाणात चढ-उतार होत असतील तर अर्थव्यवस्थेचा विकास अस्थिर स्वरूपाचा असतो. मौद्रिक आणि राजकोषीय धोरणाच्या माध्यमातून राज्यसंस्था अर्थव्यवस्थेतील चढ-उतारावर नियंत्रण ठेवण्याचे काम करते. आर्थिक भरभराटीमुळे अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रांत आनंदी-आनंद असतो. परंतु मंदीच्या परिस्थितीत मात्र अतिशय भयंकर अवस्था निर्माण होते. त्यामुळे विकासात सातत्य राखणे आणि चढ-उतारावर नियंत्रणठेवणे गरजेचे असते. सार्वजनिक खर्च, सार्वजनिक कर्ज, कर धोरणातील बदल, सार्वजनिक तूट इत्यादी राजकोषीय साधनांच्या माध्यमातून अर्थव्यवस्थेतील असंतुलन दूर करण्याचा प्रयत्नकेला जातो. आर्थिक स्थैर्य हे स्थूल अर्थशास्त्राचे महत्त्वाचे दीर्घकालीन उद्दिष्ट आहे.

4. किंमत स्थैर्य:

देशातील वस्तू आणि सेवांच्या किमतीमध्ये स्थैर्य असणे अत्यंत गरजेचे असते. किंमत स्थैर्ययाचा अर्थ वस्तू आणि सेवांच्या किमतीमध्ये अजिबात बदल होता कामा नये असा अर्थ अभिप्रेत नाही. वस्तू आणि सेवांच्या किमती जर अजिबात वाढल्या नाहीत तर उत्पादक आणि विक्रेत्यांना व्यवसायासाठी प्रोत्साहन मिळत नाही. वाढत्या किमतीमधून व्यावसायिकांना नफा मिळतो. नफ्याच्या प्रेरणेमधूनच व्यावसायिक आणि उद्योजक आपला व्यवसाय आणि उत्पादन करीत असतात.

किंमत स्थैर्ययाचा अर्थ प्रमाणात वस्तू आणि सेवांच्या किमतीमध्ये होणारी वाढ असा आहे. साधारणतः पाच टक्क्यांच्या आसपास महागाईचा दर असेल तर तो अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी आरोग्यदायी मानला जातो. परंतु महागाईच्या दरात सातत्याने वाढ होत असेल आणि तो दर मोठा असेल तर अर्थव्यवस्थेमध्ये अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होतात. महागाईचे अनेक प्रतिकूल परिणाम समाजातील सीमान्त घटकांवर होतात. पैशाचे मूल्यकमी होऊन लोकांचा चलनावरील विश्वास उडतो. अर्थव्यवस्थेत साठेबाजी आणि सट्टेबाजी सुरू होते. या प्रकारच्या परिस्थितीचा सामना करण्याची वेळ येऊ नये म्हणून

SBM RAJGURUNAGAR Bus. Economics Dept.

किमतीवर नियंत्रण ठेवणे महत्त्वाचे असते. मौद्रिक धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट किंमत स्थैर्य हेच असते. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये किमतीवर नियंत्रण ठेवणे अतिशय गरजेचे आहे. अर्जेंटिना, इथिओपिया, सोमालिया यांसारख्या अर्थव्यवस्थांमध्ये किंमतवाढीचे भयंकर परिणाम तेथील नागरिकांनी अनुभवलेले आहेत. या देशांमधील महागाईचा दर काही हजार टक्के किंवा त्यापेक्षा अधिक असल्याचे दिसून आले आहे. आर्थिक विकासाची गती वाढवत असताना त्यातून किंमतवाढीचा प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षता धोरणकर्त्यांना घ्यावी लागते. स्थूल अर्थशास्त्रामध्ये किंमत नियंत्रण हा एक महत्त्वाचा घटक आहे.

5. संतुलित आणि अनुकूल व्यवहारतोल :-

व्यवहारतोल म्हणजे एका देशाचा जगातील इतर देशांशी होणाऱ्या सर्व प्रकारच्या आर्थिक संबंधाचा लेखाजोखा होय. कोणत्याही देशाचा इतर देशाबरोबर असणाऱ्या आर्थिक संबंधामध्ये म्हणजे उपभोग्य वस्तू आणि सेवांची आयात आणि निर्यात, भांडवली वस्तूंची आयात आणि निर्यात, उत्पादक संसाधनांचे देवाण-घेवाण इत्यादीचा समावेश होतो. एका आर्थिक वर्षाच्या कालावधीत प्रत्येक अर्थव्यवस्था इतर देशांबरोबर आर्थिक संबंधाचा लेखाजोखा तयार करीत असते. अर्थव्यवस्थेतील उपलब्ध संसाधनांचा उपयोग करून सापेक्षतः कमी उत्पादन खर्चात उत्पादित केलेल्या वस्तू आणि सेवा इतर देशांना विकून त्यातून परकीय चलन मिळविले जाते. आणि देशात उपलब्ध नसणाऱ्या संसाधनांची आयात आणि उत्पादित करून शकलेल्या वस्तू आणि सेवांची आयात केली जाते. भांडवल आणि श्रमप्रधान तंत्रज्ञानाचा वापर करून देशातील वस्तू आणि सेवांची उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न प्रत्येक अर्थव्यवस्था करीत असते.

स्थूल अर्थशास्त्रामध्ये व्यवहारतोलाचा अभ्यास केला जातो. व्यवहारतोल संतुलित राखण्यासाठी आणि अनुकूल होण्यासाठी कोणत्या आर्थिक धोरणाचा अवलंब करणे गरजेचे आहे याचा अभ्यास केला जातो. अर्थव्यवस्थेतील उपलब्ध संसाधने आणि तंत्रज्ञान याचा युक्ततम उपयोग करून अधिक उत्पादकता वाढविण्याचा मार्ग अवलंबिला जातो. स्थूल अर्थशास्त्र यासंबंधीच्या सिद्धान्ताची आणि उपलब्ध मार्गाची चर्चा करते. संतुलित आणि अनुकूल व्यवहारतोल राखणे हे स्थूल अर्थशास्त्राचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

अर्थव्यवस्थेच्या गरजेनुसार स्थूल अर्थशास्त्राची उद्दिष्टे निर्धारित करण्यात येतात. निर्धारित करण्यात आलेल्या उद्दिष्टांचा प्राधान्यक्रम ठरवला जातो. ज्या देशातील बेरोजगारीचे प्रमाण अत्यंत कमी आहे त्या देशातील समग्रलक्षी अर्थशास्त्राची पूर्ण रोजगार हे प्रमुख उद्दिष्ट नसते. एखाद्या अर्थव्यवस्थेतील किमती मोठ्या प्रमाणात वाढत असतील तर त्या देशातील समग्रलक्षी अर्थशास्त्रासमोरील प्रमुख उद्दिष्ट किंमत नियंत्रण हेच असते.

SBM RAJGURUNAGAR Bus. Economics Dept

थोडक्यात, कालपरत्वे आणि अर्थव्यवस्थेची स्थिती लक्षात घेऊन समग्रलक्षी अर्थशास्त्राची उद्दिष्टे निर्धारित करण्यात येतात आणि त्यांचे प्राधान्यक्रम ठरवण्यात येतात.

6. सनातनवादी अर्थशास्त्र आणि केन्सचे अर्थशास्त्र :

समग्रलक्षी अर्थशास्त्रामध्ये प्रमुख दोन विचारधारा आहेत. सनातनवादी अर्थशास्त्र आणि केन्स यांचे अर्थशास्त्र. सनातनवादी अर्थशास्त्रज्ञामध्ये ॲडम स्मिथ, जे. एस. मिल, थॉमस माल्थस, ए. सी. पिगू, डेव्हिड रिकार्डो इत्यादीचा समावेश होतो. सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी मुक्त अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केलेला आहे. मुक्त अर्थव्यवस्था याचा अर्थकोणत्याही प्रकारचे सरकारी हस्तक्षेप नाहीत असा आहे. सरकार अर्थव्यवस्थेतील उत्पादन, उपभोग आणि गुंतवणूक यांसारख्या आर्थिक व्यवहारांमध्ये कोणत्याही प्रकारचा असा हस्तक्षेप करीत नाही. सरकारचे काम केवळ देशातील नागरिकांच्या रक्षणापुरतेच मर्यादित आहे. कायदा व सुव्यवस्था राखणे, देशाचे बाहेर शत्रूंपासून संरक्षण करणे, न्याय व्यवस्था उपलब्ध करून देणे एवढ्यापुरतेच मर्यादित स्वरूपाचे सरकारचे काम आहे.

कोणत्या वस्तूंचे उत्पादन करायचे, कोणत्या तंत्राच्या साह्याने उत्पादन करायचे, आणि कोणासाठी उत्पादन करायचे, या तीन प्रमुख आणि मध्यवर्ती प्रश्नांची सोडवणूक बाजारयंत्रणेद्वारा करावी अशी मांडणी सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी केलेली आहे. बाजार यंत्रणा मुक्त अर्थव्यवस्थेत सक्षमपणे काम करते आणि उपभोग्य वस्तू आणि सेवांच्या किमती आणि उत्पादन घटकांच्या किमतीद्वारा वस्तू आणि सेवांचे व उत्पादन घटकांचे मागणी आणि पुरवठ्याचे संतुलन घडून येते. त्यांच्या मते पूर्ण रोजगार हे भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे सामान्य वैशिष्ट्य आहे. कोणत्याही प्रकारच्या सरकारी हस्तक्षेपाशिवाय दीर्घकाळात पूर्ण रोजगार अवस्था प्राप्त करता येते. जर अर्थव्यवस्थेत अल्पकालीन असंतुलन निर्माण झाले असेल तर बाजार शक्तीच्या मदतीने दीर्घकाळात ते आपोआप अर्थव्यवस्थेत संतुलन निर्माण होते. भांडवलशाही आणि मुक्त अर्थव्यवस्थेत उत्पादनाची पातळी उच्चतम राखली जाते आणि अर्थव्यवस्था कार्यक्षम राहते अशी सनातनवाद्यांनी मांडणी केलेली आहे.

१९२९ मध्ये आलेल्या जागतिक महामंदीतून केन्सच्या अर्थशास्त्राचा जन्म झाला. मागणीचे प्रमाण घटत जाऊन न्यूनतम किंमत पातळीवर वस्तू आणि सेवांची मागणी अत्यंत कमी होती. व्याजदर अत्यंत कमी असूनसुद्धा खासगी गुंतवणूक वाढत नव्हती. संपूर्ण अर्थव्यवस्था एका नि राशेच्या खाईत लोटली गेली होती. बाजार शक्ती अपयशी ठरल्या होत्या. बाजारयंत्रणा संपूर्णतः कोलमडली होती. हे असे का झाले या प्रश्नाचे उत्तर कोणत्याही सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांना देता आले नाही. अशावेळी जे. एम. केन्स यांनी सनातनवादी

SBM RAJGURUNAGAR Bus. Economics Dept.

अर्थशास्त्रावर टीका करून १९३६ मध्ये 'रोजगाराचा सामान्य सिद्धान्त' हा ग्रंथ प्रकाशित केला. या ग्रंथांमध्ये सनातनवादी अर्थशास्त्रातील दोष दाखवून दिले. अर्थव्यवस्थेत निर्माण होणारी असंतुलन आहे आणि चढउतार यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारी हस्तक्षेपाची गरज असते असे स्पष्ट केले. केन्स यांच्या मते बाजार अर्थव्यवस्था राज्यसंस्थेकडून नियंत्रित असणे अत्यंत गरजेचे आहे अन्यथा महागाई, मंदी, आर्थिक अस्थैर्य यांसारख्या समस्यांचा सामना करावा लागतो. प्रत्येक देशात मध्यवर्ती बँकेकडून मौद्रिक धोरणाची आखणी आणि अंमलबजावणी केली जावी. पैशाच्या पुरवठ्यात बदल करून समग्रलक्षी अर्थशास्त्रीय उद्दिष्टे साध्य करता येणे शक्य आहे आणि याबरोबरच मौद्रिक धोरणाच्या बरोबरीने सरकारने राजकोषीय धोरणाचा अवलंब करावा आणि आपली नि र्धारित उद्दिष्टे साध्य करावीत अशी मांडणी केन्स यांनी केली. केन्स यांनी मांडलेल्या आर्थिक सिद्धान्तांना पुढे घेऊन जाणाऱ्या अनेक अर्थशास्त्रज्ञांना केन्स यांचे अनुयायी म्हणून ओळखले जाते.

नोबेलविजेते अर्थशास्त्रज्ञ मिल्टन फ्रिडमन यांनी केन्स यांच्या सिद्धान्तावर टीका करून नवीन मुद्रावादी अर्थशास्त्राची मांडणी अलीकडच्या काळात केलेली आहे.

7. सूक्ष्म आणि स्थूथूल अर्थशास्त्र यातील फरक आणि आतंरसंबंध:-

सूक्ष्म अर्थशास्त्रामध्ये एका आर्थिक घटकांचा अभ्यास केला जातो. दुर्मिळता आणि निवड या प्रमुख गृहीतकावर आधारित एक उपभोक्ता, एक कुटुंब, एक उद्योगसंस्था आणि एक उद्योग यांचा अभ्यास सूक्ष्म अर्थशास्त्रात केला जातो. स्थूल अर्थशास्त्रामध्ये संपूर्ण अर्थव्यवस्थेचा अभ्यास केला जातो. आर्थिक घटकांच्या समग्रतेचा आणि त्यांच्यातील परस्पर संबंधाचा अभ्यास स्थूल अर्थशास्त्रामध्ये केला जातो. जसे, राष्ट्रीय उत्पन्न , पूर्ण रोजगार, एकूण मागणी आणि पुरवठा, सामान्य किंमत पातळी इत्यादी.

सूक्ष्म अर्थशास्त्रातील आर्थिक अचल हे वैयक्तिक स्वरूपाचे असतात. जसे एक उपभोक्ता, एक कुटुंब संस्था, एका वस्तूची किंमत, एक उद्योगसंस्था किंवा एक उद्योग. एक उद्योग या संकल्पनेमध्ये एकजिनसी वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या अनेक उद्योगसंस्थांचा समावेश होतो. त्याला मर्यादित एकत्रीकरण ही संज्ञा वापरली जाते. स्थूल अर्थशास्त्रामध्ये मात्र आर्थिक चलाच्या एकत्रिततेचा अभ्यास केला जातो. देशातील सर्व उद्योगसंस्थांचे एकत्रीकरण करून औद्योगिक क्षेत्र अशी संज्ञा वापरली जाते. याच पद्धतीने सेवा क्षेत्र, कृषी क्षेत्र अशा संज्ञा वापरल्या जातात.

सूक्ष्म अर्थशास्त्रामध्ये मांडल्या जाणाऱ्या सिद्धान्तासाठी गृहीते निर्धारित केली जातात. जसे, मागणीच्या सिद्धान्तामध्ये एकूण उत्पादन स्थिर आहे असे गृहीत धरले आहे. "इतर परिस्थिती कायम असताना किंवा स्थिर असताना" या वाक्यापासून सूक्ष्म

SBM RAJGURUNAGAR Bus. Economics Dept.

अर्थशास्त्रातील सिद्धान्ताची सुरुवात होते. स्थूल अर्थशास्त्रामध्ये गृहीतांची संख्या अत्यंत कमी असते. काही वेळेला गृहीते निर्धारित केली जात नाहीत. अर्थव्यवस्थेतील वास्तविक परिस्थितीचे विश्लेषण करणे हेच समग्रलक्षी अर्थशास्त्राचे प्रमुख काम आहे.

संसाधनांची वाटणी आणि कार्यक्षम उत्पादकता हा सूक्ष्म अर्थशास्त्राचा मूलभूत गाभा आहे. उपभोक्त्याला वस्तूंच्या उपभोगापासून अधिकाधिक उपयोगिता कशी मिळेल याचे विश्लेषण सूक्ष्म अर्थशास्त्रात केले जाते. तर स्थूल अर्थशास्त्रामध्ये एकूण उत्पादनाची पातळी, एकूण रोजगाराची पातळी या प्रमुख बाबी आहेत. पूर्ण रोजगाराची पातळी कशी गाठता येईल याचे विश्लेषण स्थूल अर्थशास्त्रात केले जाते. सूक्ष्म अर्थशास्त्रातील संतुलनाला आंशिक संतुलन कसे म्हटले जाते. याचे कारण सूक्ष्म अर्थशास्त्रात एक वस्तू , एक उपभोक्ता, एक बाजार, एक उद्योगसंस्था इत्यादीचे संतुलन कसे घडून येते याचा अभ्यास केला जातो.

स्थूल अर्थशास्त्रामध्ये संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या संतुलनाचा अभ्यास केला जात असल्याने त्याला सामान्य संतुलन असे म्हटले जाते. अर्थव्यवस्थेतील वस्तू बाजार, रोखे बाजार, श्रम बाजार आणि पैसा बाजार यांचे एकत्रित संतुलन आणि परस्परावलंबित्व याचा अभ्यास स्थूल अर्थशास्त्रात केला जातो.

सूक्ष्म अर्थशास्त्राची अभ्यास पद्धती निगमन स्वरूपाची आहे. आत्मनिरीक्षण हा सूक्ष्म अर्थशास्त्राचा मूलभूत पाया आहे. याबरोबरच मर्यादित स्वरूपाच्या तथ्य संकलनावर आधारित सिद्धान्ताची मांडणी सूक्ष्म अर्थशास्त्रात केली जाते. स्थूल अर्थशास्त्रात मात्र आगमन पद्धतीचा उपयोग केला जातो. आगमन पद्धती ही खर्चिक, वेळखाऊ आणि मोठ्या प्रमाणावर तथ्य संकलनावर आधारित असल्याने ती अधिक विश्वासार्ह आणि वास्तव ठरते. स्थूल अर्थशास्त्राचा पाया वास्तविक विश्लेषणावर आधारित आहे.

सूक्ष्म आणि स्थूल अर्थशास्त्रात फरक असला तरी त्यांच्यातील आंतरसंबंध आणि परस्परावलंबित्व नाकारता येत नाही. सूक्ष्म अर्थशास्त्रातील सिद्धान्त स्थूल अर्थशास्त्रात जसे लागू होत नाहीत तसेच स्थूल अर्थशास्त्रातील सिद्धान्तदेखील सूक्ष्म अर्थशास्त्रात लागू होत नाहीत. असे असले तरी दोन्ही अर्थशास्त्रांच्या आपापल्या क्षमता आणि मर्यादा आहेत. अर्थव्यवस्थेतील वैयक्तिक आर्थिक घटकाच्या विश्लेषणाचे जसे आपले स्वतःचे महत्त्व आहे, तसेच संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या पातळीवरील विश्लेषणाचे देखील स्वतंत्र महत्त्व आहे. मुळात सूक्ष्म आणि स्थूल ह्या विश्लेषणाच्या दोन पद्धती आहेत. परंतु तांत्रिकदृष्ट्या यामध्ये फरक करून आपण दोन अर्थशास्त्र वेगवेगळे अभ्यासतो. एकाच आर्थिक चलाच्या वैयक्तिक

SBM RAJGURUNAGAR Bus. Economics Dept.

कथेचा आणि त्याच्या समग्रतेचा अभ्यास वेगवेगळा केल्यामुळे आपल्याला त्या आर्थिक चलाचे वेगळे वर्तन अभ्यासता येते आणि निष्कर्ष बांधता येतात.

**---XXX-OO-XXX---**

**---XXX-OO-XXX---**

SBM RAJGURUNAGAR Bus. Economics Dept.